CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३१८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजितदादा एका पिढीचा आत्मविश्वास होते : फडणवीस

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २३ फेब्रुवारी :** दादा एका पिढीचा आत्मविश्वास होते अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. शोकप्रस्तावावर बोलताना फडणवीसांनी दादांसोबतच्या शेवटच्या भेटीचा किस्सा आणि २०१९ च्या शपथविधीचे गुपित उलगडले आहे.

विधिमंडळ अधिवेशन सुरु झालं आहे. आज त्याचा पहिला दिवस होता. यावेळी अजित पवारांच्या नावाचा शोकप्रस्ताव मांडण्यात आला होता. आजचा सर्व दिवस हा शोकप्रस्तावावरच चर्चा होणार आहे. अजित पवारांच्या शोकप्रस्तावावर सर्वांना बोलण्याती संधी देण्यात आली आहे. त्यामुळे आता या प्रस्तावामध्ये कोण काय बोलतं याकडे सर्वांचं लक्ष लागेलेलं आहे. दरम्यान यापूर्वी कोणत्याही शोकप्रस्तावावर फक्त विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभासदच बोलत असत. दरम्यान, यावेळी सभागृहातल्या सदस्यांनी अजित पवारांबद्दलच्या त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावेळी अजित पवारांबद्दलच्या त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्याचवेळी देवेंद्र फडणवीस हे यावेळी अजित दादांसोबत झालेल्या शेवटच्या बैठकीवर बोलले आहेत. त्याचवेळी ही बैठक तब्बल पावणे तीन तास चालली होती, असंही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे.

अजित पवारांचा आणि माझा जन्म २२ जुलैचा. ते माझ्यापेक्षा ११ वर्ष मोठे. त्यांच्यात माझ्यात एक दशकाहून अधिक दीर्घ काळ जवळीक होती. २०१४ नंतर आमच्यात भावनिक नाते तयार झाले होते. अजित पवारांसोबत माझे नाते मित्रत्वाचे नाते होते, ते केवळ स्ट्रॅटेजिक नेते नव्हते, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. २७ जानेवारी २०२६ रोजी आमची भेट झाली होती. ही भेट पायाभूत सुविधांची होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी मुद्दे मांडले. नंतर आमची अँटीचेंबरमध्ये शेवटची भेट झाली. दादा कुठलेही काम कागदावर लिहून घ्यायचे. दादा हे एका पिढीचा आत्मविश्र्वास होते. शेती, पशुपालन, याविषयी पूर्ण जाण असलेले ते होते. संघर्षाला त्यांनी पाठ फिरवली नाही. जाहीर माफी मागायला त्यांनी मागे पाहिलं नाहीय अनेकांचा आधारवड असलेले दादा आपल्यात नसल्याने अनेक प्रश्र्न निर्माण झाले आहेत, असं प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.



अजित पवार हे शब्द पाळणारे नेते होते. याचा अनुभव मला २०१९ साली आला. दिलेला शब्द मोडणार नाही त्यांनी म्हटलं. पहाटेचा शपथविधी नव्हे तर सकाळचा शपथविधी असं ते म्हणायचे. काही किंमत मोजावी लागली. सुप्रीम कोर्टात निर्णय विरोधात गेल्यावर त्यांनी वर्षा बंगल्यावर माझ्याशी चर्चा केली आणि त्यांचा निर्णय बदलवला. त्यांच्या स्वभावामध्ये पारदर्शकता होती. ते तोंडावर बोलायचे. राजकीय परिणामांची पर्वा करायचे नाही. काम होणारे असेल तर ते तात्काळ करायचे आणि दादा म्हणतात ते करतात असं राजकारणातलं चित्र विरळ आहे, असं फडणवीस म्हणाले.

शेवटच्या भेटीतील आठवण सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचं प्रझेंटेशन झालं. बैठक संपली, कोणतंही काम त्यांच्या कागदावर लिहलेलं असायचं काय बोलायचं आहे गे त्यांनी थोडक्यात लिहिलेल असायच. पावणेतीन तास आम्ही एकत्र होतो. ती आमची शेवटची भेट असेल याची पुसटशीही कल्पना नव्हती, असं बोलताना मुख्यमंत्री फडणवीस भावूक झाले.

## थोडक्यात...

### मुकुल रॉय यांचे निधन

**कोलकाता :** माजी रेल्वेमंत्री आणि तृणमूल काँग्रेसचे नेते मुकुल रॉय यांचे निधन झाले. रविवारी मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. कोलकातामधील साल्ट लेक येथील अपोलो रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. ते ७१ वर्षांचे होते.

पश्र्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे एकेकाळी अत्यंत जवळचे सहकारी मानले जाणाऱ्या मुकुल रॉय यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले. कोलकाता येथील अपोलो रुग्णालयात उपचारादरम्यान कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे सुपुत्र सुभ्रांशू रॉय यांनी याविषयी माहिती दिली. डिमेंशियाचे निदान झालेले मुकुल रॉय अनेक आजारांनी ग्रस्त होते. काही दिवसांपूर्वी ते कोमात गेले होते.

### मुख्याध्यापकाचे शिक्षिकेशी लग्न

**पाटणा :** युद्धात आणि प्रेमात सारं काही माफ असतं असं म्हणतात. प्रेम करणं ही वाईट गोष्ट नाही. प्रेम ही खूप सुंदर भावना आहे. पण आपण नेमकं कुणासोबत प्रेम करतोय आणि आपलं भवितव्य काय असणार? याचा विचार आपण नक्कीच करायला हवा. अर्थात तो प्रत्येकाचा खासगी मुद्दा आहे. असं असलं तरी नेपाळमध्ये पार पडलेल्या एका लग्नाने बिहारमधील वातावरण तापलं आहे. त्यामागे कारणही तसंच आहे. बिहारच्या मुजफ्फरपूरचे ६० वर्षीय एका खासगी शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेतीलच २८ वर्षीय शिक्षिकेसोबत नेपाळमध्ये जावून लग्न केलं आहे. त्यांच्या लग्नाचे फोटो समोर आल्यानंतर मुजफ्फरपूरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

### १२ भारतीय मासेमारांना अटक

**कोलंबो :** श्रीलंकेच्या नौदलाने पंबनमध्ये १२ भारतीय मच्छिमारांना अटक केली आहे, ज्यामुळे या भागातील मच्छिमारांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. बंदरातून मासेमारीची परवानगी घेऊन १२ मच्छिमार समुद्रात गेले होते असे वृत्त आहे. धनुषकोडी आणि थलाईमन्नार समुद्रकिनाऱ्यांजवळ पोहोचलेल्या श्रीलंकेच्या नौदलाने त्यांची मोटरबोट जप्त करून त्यांना अटक केली. त्यांना मन्नार नौदल छावणीत नेण्याची योजना आहे. कच्छतीवू उत्सवापूर्वी १२ मच्छिमारांच्या अटकेचा एआयटीयूसी मच्छिमार संघटनेने तीव्र निषेध केला आहे. युनियनचे अखिल भारतीय उपाध्यक्ष सेंथिलवेल यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, रामेश्र्वरम आणि मंडपम भागातून मासेमारी करणाऱ्या १२ मच्छिमारांना कच्छतीवू आणि नेदुंथीवूजवळ मासेमारी करताना श्रीलंकेच्या नौदलाने वेढा घालून अटक केली. या अटकेमुळे मासेमारी करणाऱ्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप निर्माण झाला आहे.

### तरुणीचा हात खांद्यापासून तुटला

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकावर सोमवारी (दि. २३) एक धक्कादायक अपघात घडला. प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वर आलेल्या महानगरी एक्सप्रेसच्या ड-५ आणि ड-६ डब्यांखाली एक महिला पाय घसरून पडल्याची माहिती स्टेशन मास्तरांनी अनाऊन्समेंटद्वारे दिली.या घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस आणि हमाल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. महिलेला गाडीखालून बाहेर काढण्यात आले असता तिचा उजवा हात खांद्यापासून पूर्णपणे तुटून वेगळा झाल्याचे आढळले. तसेच उजव्या गुडघ्याच्या वरच्या भागातील त्वचा गंभीररीत्या निघाल्यामुळे ती गंभीर जखमी झाली होती. अपघाताच्या वेळी संबंधित महिला शुद्धीवर असल्याचे सांगण्यात आले. स्टेशन मास्तरांचा मेमो घेऊन दोन हमालांच्या मदतीने जखमी महिलेला रुग्णवाहिकेद्वारे छत्रपती शिवाजी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना ‘सुप्रीम’ ब्रेक

### आरक्षण ओलांडलेल्या २२ जिल्हा परिषदांची निवडणूक लांबणीवर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलंडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टानं मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्यांअतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टानं दिले होते. राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्र्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के



मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्र्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं अशी परवानगी देता येणार नसल्याचं म्हटलं.

राज्यातील राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्र्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागलं आहे.

ओबीसींच्या महाराष्ट्रातील राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचं सुप्रीम कोर्टानं सांगितलं आहे. अंतिम सुनावणी लवकर घेऊ अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयानं घेतली आहे. अंतिम सुनावणी पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश सुप्रीम कोर्टानं दिला आहे.

## महाराष्ट्राच्या विधिमंडळात प्रथमच संपूर्ण ‘वन्दे मातरम्’चे स्वर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २३ फेब्रुवारी :** महाराष्ट्राच्या विधिमंडळात प्रथमच संपूर्ण ‘वन्दे मातरम्’चे स्वर घुमले. सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी ६ कडव्यांचे आणि ३ मिनिटे १० सेकंदांचे संपूर्ण ‘वन्दे मातरम’ म्हणून महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला प्रारंभ झाला. ‘वन्दे मातरम्’ गीतानंतर ‘जय जय महाराष्ट्र माझा’ हे महाराष्ट्र गीत म्हटले गेले. राज्यपालांच्या अभिभाषणापूर्वीही प्रथम ‘वन्दे मातरम्’, त्यानंतर ‘जन-गण-मन’ हे राष्ट्रगीत आणि त्यानंतर महाराष्ट्र गीत म्हणण्यात आले.

‘वन्दे मातरम्’ गीताचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान लक्षात घेऊन या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्रशासनाने सर्व शासकीय कार्यक्रमांमध्ये संपूर्ण ‘वन्दे मातरम्’ म्हणणे अनिवार्य केले आहे. यासह ‘जन-गण-मन’ पूर्वी ‘वन्दे मातरम्’ गीत म्हणण्याचा नवीन नियम लागू केला आहे, तसेच ‘वन्दे मातरम्’ गीताच्या सन्मानार्थ सर्वांनी उभे रहाणे बंधनकारक करण्यात आले आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये प्रथमच या नियमाची कार्यवाही झाली आहे.

# तात्काळ देश सोडा! इराणमधील भारतीयांना भारत सरकारचा गंभीर इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या तेहरान येथील दूतावासाने ईरानमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना उपलब्ध सर्व वाहतूक मार्ग वापरून ताबडतोब देश सोडून जाण्याचा सल्ला दिला आहे. या सूचना आज २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्या आहेत. त्यात विद्यार्थी, व्यापारी तसेच पर्यटक या सर्वांना देश सोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.वृत्तपत्र सदस्यता

ईरान आणि अमेरिका यांच्यात पुढील काळात संघर्ष किंवा सैन्य कारवाई होण्याची शक्यता आहे, तसेच देशात नव्याने सुरू झालेल्या विरोधी मोर्च्यांमुळे परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे भारत सरकारने हा निर्णय घेतला आहे.

भारतीय दूतावासाने नागरिकांना अतिरिक्त खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. विशेषतः जिथे विरोधी आंदोलनं, मोर्चे किंवा निदर्शनं सुरू आहेत अशा भागांपासून दूर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ईरानमधील सर्व भारतीय नागरिकांनी दूतावासाशी सातत्याने संपर्कात राहावे आणि स्थानिक माध्यमांमधून परिस्थितीवर लक्ष ठेवावे, असेही सांगण्यात आले आहे.

दूतावासाने आणखी एक महत्त्वाची सूचना देताना म्हटले की, पासपोर्ट, व्हिसा, ओळखपत्रांसह सर्व प्रवास आणि इमिग्रेशन कागदपत्रे नेहमी जवळ ठेवावीत. कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीत किंवा पासपोर्ट व इमिग्रेशन संदर्भातील मदतीसाठी थेट भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन मदतीसाठी दूतावासाने हेल्पलाइन क्रमांकही जाहीर केले आहेत. ईरानमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी गरज पडल्यास +९८ ९१२८१०९११५, +९८ ९१२८१०९१०९, +९८ ९१२८१०९१०२, +९८ ९९३२१७९३५९ या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात. याशिवाय cons.tehranmea.gov.in या ई-मेलवरही मदतीसाठी संपर्क साधता येईल. तसेच, ईरानमध्ये वास्तव्यास असलेल्या ज्या भारतीय नागरिकांनी अद्याप भारतीय दूतावासात नोंदणी केलेली नाही, त्यांना तात्काळ ME-ERS पोर्टलवर (https://www.meaers.com/request/home) नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इंटरनेट सेवा बंद असल्यामुळे जर ईरानमधून नोंदणी करणे शक्य नसेल, तर भारतातील त्यांच्या कुटुंबीयांनीही त्यांच्या वतीने नोंदणी करू शकतात, असे दूतावासाने स्पष्ट केले आहे.

एकूणच, पश्र्चिम आशियातील वाढता तणाव आणि ईरानमधील अस्थिर परिस्थिती लक्षात घेता, भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत सरकार आणि दूतावासाने ही तातडीची पावले उचलली आहेत. ईरानमधील भारतीयांनी घाबरून न जाता, सूचनांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षित मार्गाने देश सोडणे हाच सध्या पर्याय असल्याचे दूतावासाने सांगितले आहे.

# साखर आयुक्तांचा मोठा दणका! थकीत एफआरपीवर आता १५% व्याज द्यावेच लागणार

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ फेब्रुवारी :** राज्यातील २०२५-२६चा ऊस गाळप हंगाम अंताकडे आला असतानाही अद्याप अनेक कारखान्यांनी शेतकऱ्यांना पुर्ण रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) अदा केलेली नाही. या कारखान्यांची काही दिवसांपूर्वी साखर आयुक्तालयात सुनावणी झाली. या प्रलंबित एफआरपीवर १५ टक्के व्याज द्यावेच लागेल, असा इशारा राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी या कारखान्यांना दिला आहे.

शेतकऱ्यांशी झालेल्या करारानुसार शेतकऱ्यांना एफआरपी दिली जात असल्याचे स्पष्टीकरण काही कारखान्यांनी साखर आयुक्तांना दिले आहे. उपलब्ध अद्ययावत माहितीनुसार १ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या गाळप हंगामासाठी राज्यात एकूण २०६ साखर कारखान्यांनी परवाना घेतला होता. त्यांनी एकूण



८७० लाख टन ऊसाचा गाळप केला असून, त्यातून शेतकऱ्यांना २५,२१७ कोटी रुपये देणे आहे. त्यापैकी २०,२०९ कोटी म्हणजेच ८२.८९ टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळाली आहे.

यापैकी १०० टक्के एफआरपी देणाऱ्या कारखान्यांची संख्या ४९ असून ८० ते ९९ टक्के एफआरपी देणाऱ्या कारखान्यांची संख्या ५८ आहे. ५८ कारखान्यांनी ६० ते ८० टक्क्यांपर्यंतची रक्कम शेतकऱ्यांना देऊ केली आहे. ६० टक्क्यांपर्यंत एफआरपी देणारे ४१ कारखाने राज्यात आहेत. एकूण १५७ कारखान्यांकडे एफआरपीचे देणे आहे. साखर नियंत्रण कायद्यानुसार ऊस गाळप झाल्यानंतर १५ दिवसांत शेतकऱ्यांना त्यांची एफआरपीची रक्कम देणे कारखान्यांना बंधनकारक आहे.

त्यानंतर ६० टक्क्यांहून कमी देणी दिलेल्या कारखान्यांची सुनावणी आयुक्तांकडे झाली. या कारखान्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात एफआरपीची रक्कम देण्याबाबत ऊस उत्पादकांसमवेत करार केलेले आहेत, असे सांगितले. त्यानंतर करार झाला असला, तरी विलंबित कालावधीसाठी कारखान्यांना व्याज द्यावे लागेल, असे आयुक्तांनी सांगितले आहे.

काही कारखान्यांनी थकीत एफआरपीची ३१ जानेवारी २०२६ अखेरची रक्कम आम्ही फेब्रुवारी महिनाअखेर देऊ, असे सुनावणीत स्पष्ट केले आहे. त्यावर संबंधित कारखान्यांची पुढील सुनावणी दिनांक १० व ११ मार्च रोजी ठेवली आहे. एफआरपीची रक्कम देताच तसा अहवालही आयुक्तालयास सादर करण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले.

# मान्सूनवर ‘एल निनो’चं सावट; २०२६ च्या उत्तरार्ध बळीराजाची चिंता वाढविणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२६ च्या शेवटच्या सहा महिन्यांत 'एल निनो' येण्याची शक्यता आहे. ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात एल निनो येण्याची शक्यता ६० टक्के असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यापूर्वी हा अंदाज ५०% होता, मात्र आता त्यात वाढ झाली आहे. साधारणपणे 'एल निनो' सक्रिय असणार्या वर्षात भारतात पाऊस कमी पडतो आणि उन्हाळ्याचा तडाखा जास्त जाणवतो. हवामानाचा नवीन अंदाज देशातील बळीराजाची चिंता वाढविणार आहे.

कोलंबिया विद्यापीठ आणि नासा यांच्या अहवालानुसार, पॅसिफिक महासागरातील 'ला निना'चा प्रभाव आता संपत चालला आहे. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत ही परिस्थिती निवळली आहे. फेब्रुवारी ते एप्रिल २०२६: 'ला निना' राहण्याची शक्यता फक्त ४ टक्के आहे. म्हणजेच, या काळात हवामान सामान्य स्थितीत राहण्याची शक्यता ९६ टक्के इतकी आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ही शक्यता ६५ टक्के इतकी होईल, असे कोलंबिया क्लायमेट स्कूलच्या इंटरनॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूटने १९ फेब्रुवारी रोजी स्पष्ट केले आहे.

हवामान विभागाच्या मते, फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान 'ला निना' संपून हवामान 'सामान्य' व्हायला सुरुवात होईल. याची शक्यता ६०% आहे. त्यानंतर, उत्तर गोलार्धात उन्हाळा संपेपर्यंत ही 'सामान्य' स्थिती कायम राहू शकते. या अहवालानुसार, मे महिन्यापासून 'एल निनो' येण्याची शक्यता वाढणार आहे. ही शक्यता साधारणपणे ५८ ते ६१% इतकी आहे. या काळात हवामान सामान्य राहण्यापेक्षा 'एल निनो'चा प्रभाव पडण्याची शक्यता जास्त आहे.




जागतिक हवामान संघटनेचा २० फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, मार्च ते मे २०२६ या काळात पॅसिफिक महासागराच्या तापमानात मोठे बदल होणार आहेत. सध्या समुद्राच्या पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा कमी आहे, ज्याला आपण 'ला निना' म्हणतो; पण आता हे तापमान हळूहळू वाढू लागेल. याचाच अर्थ असा की, सध्याचा कमकुवत झालेला 'ला निना' आता पूर्णपणे संपून हवामान 'सामान्य' स्थितीकडे सरकणार आहे.

# थोडक्यात...

## अंडाशयाच्या गाठीवर यशस्वी व सुरक्षित शस्त्रक्रिया

**सोलापूर :** उजव्या अंडाशयामध्ये मोठी गाठ आढळलेल्या ५६ वर्षीय महिलेवर मेडिकव्हर केएलई हॉस्पिटल, पुणे येथे अत्याधुनिक वैद्यकीय पद्धतींचा वापर करून यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णावर एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमीसह सॅल्पिंगो-ओओफोरेक्टॉमी आणि सविस्तर सर्जिकल स्टेजिंग प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडण्यात आली. ही महत्त्वाची शस्त्रक्रिया डॉ. आशिष शाहुराव बांगर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या प्रक्रियेमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ, अंतर्गत औषधोपचार तज्ज्ञ तसेच भूलतज्ज्ञ यांचा समन्वय साधत बहुवैद्यकीय पद्धतीने उपचार करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान बाधित अंडाशय व फलोपियन ट्यूब पूर्णपणे काढून टाकण्यात आली. त्याचबरोबर पेरिटोनियल साइटोलॉजीसाठी नमुने घेण्यात आले तसेच रोगाचा फैलाव तपासण्यासाठी आवश्यक त्या स्टेजिंग बायोप्सी करण्यात आल्या.शस्त्रक्रियेदरम्यान करण्यात आलेल्या फ्रोजन सेक्शन तपासणीत कोणताही आक्रमक कर्करोग आढळून आला नाही, ही बाब रुग्णासाठी दिलासादायक ठरली. यामुळे पुढील उपचारांची दिशा अचूकपणे ठरवणे शक्य झाले आणि अनावश्यक आक्रमक उपचार टाळता आले.

## जसप्रीत बुमराहची 'नटखट' भूमिका

**छत्रपती संभाजीनगर :** सनफीस्ट यिप्पी! च्या नवीन मोहिमेत अगदी शांत स्वभावाचा जसप्रीत बुमराह त्याच्या चाहत्यांनी त्याला आधी कधीच बघितले नव्हते अशा भूमिकेत दिसणार आहे - तो यात अगदी नटखट, हुशार आणि वास्तव जिवनात तो जसा आहे तसाच या मोहिमेत असून त्याने ब्रँडच्या प्रसिद्ध 'मॅजिक मसाला' प्रकारावर लक्ष केंद्रित केले आहे. याची संकल्पना ओगल्वीची असून, मॅजिक मसाला मोहिमेत बुमराह एक बोल यिप्पी! नूडल्स खाण्यास रममाण होतो आणि लगेच त्याची सगळी चिंता विसरून जातो. बुमराहने मॅजिक मसालाच्या अगदी चविष्ट आणि उत्तम फ्लेवरची चव घेतल्यावर लगेच त्याच्या नटखट भूमिकेत तो दाखवतो की, स्नॅक्स खाण्याची गंमत तेव्हाच असते, जेव्हा आपण 'खातांना आपल्याकडे कोणीच बघितले नाही असे खातो.'

## शेतकऱ्यांना आधार आणि सन्मान देण्याची गरज -आ.सुभाष देशमुख

**छत्रपती संभाजीनगर :** शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता आणि त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येक संस्था आणि राजकीय नेत्यांनी पुढे येण्याची गरज आहे. राज्यामध्ये समृद्ध शेतकऱ्यांचा एक समूह तयार केला, तर राज्य आणि देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करेल. तरुणांनी शेती व्यवसायामध्ये चांगल्या पद्धतीने काम करून शेतीचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे तसेच पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी एक दिवस सोलापूर येथे येऊन आमच्या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची देखील त्यांनी विनंती केली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले.लोकमंगल समूह आयोजित ,लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालय पूरस्कृत लोकमंगल कृषी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी आमदार देशमुख हे बोलत होते. पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. श्रीरंग लाड परभणी (ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ) व सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास शिंदे (नाशिक )हे उपस्थित होते.

## ग्रामीण जीवनांवर सकारात्मक प्रभाव साधला

**मुंबई :** भारतातील अग्रगण्य एनबीएफसींपैकी एक असलेल्या एसएमएफजी इंडिया क्रेडिटने १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या प्रमुख पशुधन कल्याण आणि ग्रामीण उपजीविका उपक्रमाचा ८ वा पशु विकास दिन (झतऊ) यशस्वीरीत्या पूर्ण केला. 'सर्वोत्तम सेवा: पशु, परिवार आणि प्रगती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाने पशुधनाचे आरोग्य, कुटुंबाचे कल्याण आणि शाश्र्वत प्रगती यांना बळकटी देत सर्वांगीण ग्रामीण विकासाबाबत संस्थेची बांधिलकी अधिक दृढ केली. २०१४ मध्ये सुरू करण्यात आलेला पशु विकास दिन हा उपक्रम पशुपालन करणाऱ्या व्यक्तींच्या अत्यावश्यक आरोग्य गरजांकडे लक्ष देतो आणि त्यांना मोफत पशुवैद्यकीय सेवा व तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देतो. गेल्या काही वर्षात हा उपक्रम देशातील सर्वात मोठ्या एकदिवसीय पशुधन कल्याण कार्यक्रमांपैकी एक म्हणून विकसित झाला आहे.

## हार्पिकची दशकातील सर्वात मोठी झेप

**छत्रपती संभाजीनगर :** भारतामधील क्रमांक १ टॉयलेट आणि बाथरूम क्लीनर असलेल्या हार्पिकने, ज्यावर देशातील १० कोटींहून अधिक घरांचा* विश्र्वास आहे, आपल्या बाथरूम स्वच्छतेतील आतापर्यंतचे सर्वात प्रगत उत्पादन - 'नवीन हर्पिक बाथरूम अल्ट्रा क्लीनर' - बाजारात आणल्याची घोषणा केली आहे. गेल्या दशकातील बाथरूम क्लीनिंग क्षेत्रातील हार्पिकची ही सर्वात मोठी नवकल्पकता मानली जात आहे. हट्टी आणि सर्वाधिक आढळणारे बाथरूममधील डाग प्रभावीपणे काढून संपूर्ण बाथरूम 'अल्ट्रा क्लीन' करण्यासाठी हे उत्पादन खास तयार करण्यात आले आहे. या उत्पादनाच्या दमदार आणि विश्र्वासार्ह डाग हटवण्याच्या वचनाला अधिक बळ देण्यासाठी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी ब्रँड ॲम्बेसीडर म्हणून सहभागी झाला आहे.भारतीय शहरांमधील अनेक घरांमध्ये बाथरूममध्ये पिवळे डाग, हार्ड वॉटरमुळे तयार होणारा थर (लाइमस्केल) आणि गंजासारखे हट्टी डाग ही मोठी समस्या असते. वेळ जसजसा जातो तसतसे लोकांना वाटू लागते की हे डाग काढणं जवळपास अशक्य आहे. यावर खात्रीशीर उपाय नसल्याने अनेकजण साधे डिटर्जंट, ब्लीच किंवा फिनाइलसारखी सर्वसाधारण उत्पादने वापरतात. पण ही उत्पादने हार्ड वॉटरच्या डागांवर फारसा परिणाम करत नाहीत आणि कधी कधी पृष्ठभागालाही घासून टाकतात, त्यामुळे बाथरूमचा लुक अधिकच निस्तेज दिसू लागतो.

# ऐतिहासिक बहुमूल्य ठेव्यावर दरोडा; प्राचीन नगरीतील प्रकार

**तभा वृत्तसेवा/ मंगलसिंग भवरे**
**पैठण, दि. २३ फेब्रुवारी :**
ऐतिहासिक नगरी शके कर्ता सातवाहन घराण्याची राजधानी असलेल्या प्राचीन पैठणला हजारो वर्षे जुन्या वास्तू, नाणी,शिल्प आदी वस्तू गोदावरी वाळवंटात सापडण्यास सुरुवात झाली असून या राष्ट्रीय धरोहरावर काही व्यापारिंकडुन दरोडा टाकण्याचा प्रकार उघडकीस येत आहे.वस्तूचे मूल्य माहित नसलेल्या लोकांना पैशाची लालूच दाखवून त्याची फसवणूक करत दक्षिण काशीत सापडलेला ऐतिहासिक बहुमूल्य ठेवा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकल्या जात असल्याची दाट शक्यता आहे.





पैठणनगरीला मोठा ऐतिहासिक वारसा असून सातवाहन घराण्याची ही राजधानी होय. आर्थिक सुबत्ता आणि श्रीमंतांचे नगर म्हणून पैठणकडे पाहिले जाते.आधी सोन्याचे जरीचे मार्केट आणि आता शुद्ध सोन्यासाठी पैठण प्रसिद्ध आहे. सातवाहन,शिवकालीन इतिहासात पैठणची नोंद आहे. त्यातच जगाला पसायदान मागणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर महाराज माऊलींचे जन्मस्थान व शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांची ही कर्मभूमी, महानुभव पंथाचे ही पैठण श्रद्धास्थान, शेकडो वर्षांपासून याठिकाणी चालणारी धर्म संसद, गोदावरी तिरावर वसलेल्या या शहाराला मोक्ष भूमी दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते.

पैठणच्या पालथी नगरीत सोने सापडते म्हणून ही जागा पुरातत्व खात्याच्या ताब्यात आहे.आता नाथषष्टी यात्रेत येणाऱ्या वारकरी भविक भक्तांसाठी गोदावरी वाळवंट पाणी मुक्त करण्यात येत आहे. सप्टेंबर महिन्यात गोदावरीला आलेल्या मोठ्या महापूरामुळे नदी प्रवाहाचा मोठा भाग वाहून गेल्याने याठिकाणी राख चाळण्याऱ्या लोकांना सोने, चांदी, पितळ, कास्य, तांबे आदी धातुंची नाणी , शिल्प, वास्तू सापडण्यास सुरुवात झाल्याने ही खबर वाऱ्यासारखी पसरली.काबाडकष्ट करणाऱ्या लोकांकडून या वस्तू काही मंडळीकडुन गैरमार्गाने विकत घेतल्या जात आहे. जेकी राष्ट्रद्रोहा सारखा गुन्हा आहे.

**कुठे सापडतात या वस्तू**

नाथसमाधी मंदिरा पासून गागा भट्ट चौक ते नागघाट परिसराच्या गोदावरी पात्रात या वस्तू सापडतात. सध्याच्या घडीला गणेश घाट देवनाथ मंदिर घाट व कालिकेश्र्वर महादेव मंदिर ( नऊ सिड्या) समोरील गोदावरी पात्रात या वस्तू विशेषतः मिळण्यास सुरुवात झाली आहे.अमूल्य ठेव मिळत असल्याने याठिकानी शहरासह तालुक्यातील पाचशेच्या आसपास लोक पाण्यात चाळणी घेऊन सोन सापडवत आहे. यात अनेकांना सोने, चांदी, तांबे धातूचे नाणी , पितळी वस्तू मिळून आल्या.ही बाब समजताच याठिकाणी पैशाची बॅंग घेऊन व्यापारी आलेले दिसताच. वस्तू मिळाली की पटकन विकत घ्यायचा सपाटा सध्या याठिकाणी सुरु आहे.

**काय वस्तू सापडत आहेत**

सोन्याचे नाने, त्याचा वितळलेला भाग, चांदीचे नाने, चांदीची वस्तू, तांब्याचे नाने,तांब्याची वस्तू, कास्याचे नाने, त्याच्या वस्तू तसेच प्राचीन धातुंचे अवशेष मिळण्यास सुरुवात झाली आहे.

**काय म्हणते पुरातत्व खाते**

सातवाहन काळ हा साधारण ३ हजार वर्षे जुना काळ असून त्याकाळी सोने आणि चांदी धातूचे नाणी वापरात होते. तसेच ईतर काळात व शिवकालीन स्वराज्यात तांबे, पितळ, कास्य धातूची नाणी चलनात होते. साधारण तहा शंभर वर्षे जुनी वास्तू, नाणी, शिल्प आणि ईतर प्रकारचे वास्तु एतेहासिक धरोहर आहेत.

अंतराष्ट्रीयस्तरावर जुन्या प्राचीन,पुरातत्व वस्तुंना मोठी मागणी असून याला मोठी किंमत मिळते. जागतिक बाजार पेठेत देशासह राज्यातून प्राचीन काळातील वस्तू रॅकेट मार्फत विकल्या जात आहेत. पैठणला सुद्धा याच रॅकेटची लोक वरील प्रकारात असण्याची दाट शक्यता आहे. याप्रकरणी पोलिसांनी हस्तक्षेप केल्यास नक्कीच पर्दाफाश होण्याची चिन्हे आहेत.

# भक्ती ही केवळ शब्दांत नव्हे, तर आचरणातून प्रकट व्हावी : सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ फेब्रुवारी :** नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण आणि पर्यावरण संतुलनाच्या उद्देशाने संत निरंकारी मिशन यांच्या सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाचा चौथा टप्पा देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमध्ये १६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीरीत्या राबविण्यात आला. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदविला.



छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल तलाव तसेच पैठण येथील गोदावरी नदी मोक्ष घाट परिसरात २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते ११ या वेळेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, जिल्हा संयोजक डी. जी. दळवी, पैठणचे नगराध्यक्ष भूषण कावसनकर व सेवादल क्षेत्रीय संचालक विजय बोडखे उपस्थित होते. सिडको, सिंधी कॉलनी, वाळूज, जामखेड, पाचोड व पैठण शाखेतील हजारो सेवादल सदस्यांनी शिस्तबद्ध सहभाग नोंदविला.

सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेला 'प्रोजेक्ट अमृत' हा उपक्रम बाबा हरदेव सिंह जी महाराज यांच्या शिकवणुकीतून प्रेरित असून जलसंरक्षण, स्वच्छता व पर्यावरणाबाबत जनजागृती करण्याचा उद्देश आहे.

दिल्लीतील विशेष सत्संग कार्यक्रमात सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी भक्ती ही केवळ शब्दांत नव्हे, तर आचरणातून प्रकट व्हावी, असे प्रतिपादन केले. सेवा, सुमिरण व सत्संग यांच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवत मिशनतर्फे 'संत निरंकारी हेल्थ सिटी'सारखे मानवसेवेचे प्रकल्पही उभारले जात आहेत. जलसंरक्षण व वृक्षारोपणासारख्या उपक्रमांतून मानव व निसर्ग यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याचा संदेश देण्यात आला.

## थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, दि. २३ फेब्रुवारी :** सोयगाव शहरातील समाजसेवक दत्तू रोकडे यांच्या दुकाना समोर विविध उपस्थित मान्यवरांनी थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.यावेळी समाजसेवक दत्तू रोकडे,अण्णा जाधव,रामराव रोकडे,गोकुळ रोकडे,रमेश रोकडे,भागवत रोकडे,संतोष महाले,विकास रोकडे,भगवान पंडित,अमोल निकम,नाना फुसे,राजू आप्पा औरगे,डॉ.रघुनाथ फुसे,रघुनाथ काटोले,नंदू मंडवे,विश्र्वनाथ बोडखे,देवेंद्र पंडित,सुनील वाघ,समाधान बावस्कर,दिलीप सुरळकर,आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# कपाट तोडून १ लाख ७८ हजाराचे दागिने चोरट्यांनी केले लंपास



**तभा वृत्तसेवा**
**अजिंठा, दि. २३ फेब्रुवारी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना परिसरात चोरट्यांच्या सुळसुळाट सुरूच असून देव दर्शनाला गेलेल्या कुटुंबांचे घरातील कपाट तोडून सोने चांदीच्या सुमारे १ लाख ७८ हजाराचे दागिने अज्ञात चोरट्यानी लंपास केल्याचे शुक्रवारी (दि.२०) उघडकीस आले आहे.

सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील वैशाली संजय गुप्ता यांनी अजिंठा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत ते कुटुंबासह दि.१२ रोजी नागपूर येथील एका लग्नात गेले होते.तेथून ते दि.१६ रोजी राजस्थान येथील खाटू श्याम बाबा मंदिरात दर्शनासाठी गेले असता त्यांना त्यांच्या शेजाऱ्याने दि.१७ रोजी फोन करून सांगितले की तुमच्या घरात काहीतरी गडबड असून बाहेरील दरवाजाला फक्त कडी लावलेली दिसत आहे.यावरून त्यांनी शेजारी व गावातील प्रतिष्ठितांना सांगून पाहणी करायला सांगितले असता त्यांना चोरी झाल्याचे समजले.त्यांनी दि.२० रोजी अजिंठा पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली असता घरातील कपाटात ठेवलेले सुमारे एक १लाख ७८ हजार रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने कपाटातील लॉकर तोडून अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि अमोल ढाकणे,पोउनि धम्मदीप काकडे,पोहेकॉ भागवत शेळके,संदीप कोथलकर आदी करीत आहे.

## ६ वर्षीय जुनेरा शादाब नदीम शहा हिचा पहिला रोजा यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**लासूर स्टेशन, दि. २३ फेब्रुवारी :** लासूर स्टेशन येथे रमजानच्या पवित्र महिन्यात एक प्रेरणादायी घटना घडली आहे. रमजानचा महिना म्हणजे संयम, शिस्त आणि भक्तीचा काळ मानला जातो. याच भक्तीभावाचा सुंदर संगम अवघ्या ६ वर्षीय जुनेरा शादाब नदीम शहा हिने आपल्या कृतीतून दाखवून दिला आहे. कडक उन्हाची तमा न बाळगता जुनेराने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण केला. सध्या उन्हाळ्याची चाहूल लागल्याने तापमानात वाढ होत असून अशा वातावरणात दिवसभर अन्न-पाण्याविना राहणे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक ठरते. मात्र, जुनेराने पहाटेपासूनच रोजा पाळण्याचा निश्र्चय केला होता. दिवसभर तिने आनंदी व उत्साही वातावरणात रोजा पाळला. सायंकाळी इफ्तारच्या वेळी खजूर खाऊन तिने आपला पहिला रोजा पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे, धैर्याचे आणि भक्तीभावाचे सर्वत्र कौतुक होत आहे. परिसरातील नागरिकांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला असून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना व्यक्त केली आहे.

# शिवजयंती उत्सव २०२६ उत्साहात आणि दिमाखात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २३ फेब्रुवारी :** कॅनरा बँक प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सव २०२६ हा कार्यक्रम हनुमान मंदिर मैदान, सुराणा नगर येथे सायंकाळी ६.३० वाजता मोठ्या उत्साहात आणि दिमाखात यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. केशवमूर्ती बी. व्ही. उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शक म्हणून Aurangabad Smart City Development Corporation Ltd. चे डिप्टी कमिशनर श्री. रवींद्र जोगदंड उपस्थित होते. तसेच व्याख्याते व नाट्यकलावंत श्री. रमेश शिंदे (एम. ए. मराठी) यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून मनपाचे शिक्षण नियंत्रण अधिकारी श्री. गणेश दांडगे तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) चे नि. कार्यकारी अभियंता श्री. सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्री. रवींद्र जोगदंड व श्री. रमेश शिंदे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा प्रेरणादायी आढावा घेत उपस्थितांमध्ये देशभक्ती व स्वाभिमानाची भावना जागृत केली.

प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आली. अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. अखेरीस, कॅनरा बँक प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने सर्व मान्यवर, आयोजक व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. शिवाजी महाराजांच्या विचारांचे स्मरण करत समाजात ऐक्य, शौर्य आणि राष्ट्रप्रेम वृद्धिंगत करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## विठ्ठल वाकडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**पैठण, दि. २३ फेब्रुवारी :** येथील विठ्ठल चिंतामणराव वाकडे ७५ (गुरुजी) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ६ विवाहित मुली, जावयी व नातवंडे असा परिवार आहे. श्रीनाथ हायस्कूल येथे ते शिक्षक होते. टाकळी-अंबड येथे सरपंच असताना त्यांनी सामुदायिक तुती लागवड व गोबर गॅस प्रकल्पाचा प्रचार प्रसार करत मोठे योगदान दिले होते. तत्कालीन जिल्हाधिकारी आनंद कुलकर्णी यांनी त्यांचा विशेष सन्मान केला होता.



# आजचा दिवस आनंदाने आणि माणुसकीने जगून घ्या

**तभा वृत्तसेवा**
**बिडकीन, दि. २३ फेब्रुवारी :** मृत्यू हे जीवनाचे अटल आणि अंतिम सत्य आहे.तो कोणाला कधी, कसा आणि केव्हा भेटेल याचा काही नेम नाही. सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती सायंकाळी परत येईल याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीचे जीवन ताणतणावात व अनेक अपेक्षांच्या ओझ्याखाली जगतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि अजून बरेच काही मिळवायचं आहे या विचारात आजचा क्षण आपण विसरून जातो. आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होत, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे याची आपल्याला जाणीव होते. त्यावेळी लक्षात येते की माणसाने कमावलेला पैसा, पद, प्रतिष्ठा,मान, सत्ता या सर्व गोष्टी तिथेच राहतात आणि माणसांसोबत जात ते फक्त त्याने कामावलेले प्रेम, आदर,माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण. म्हणूनच जोपर्यंत जिवंत आहात तोपर्यंत माणुसकी जपा, नात्याकडे दुर्लक्ष करू नका. आई वडिलांशी प्रेमाने बोला, मित्रांजवळ मन मोकळ करा. मनात कसलाच राग, मत्सर, मोह, अहंकार बाळगू नका. माफ करणं शिका कारण वेळ आणि काळ कोणासाठीच थांबत नाही.भौतिक सुख क्षणिक आहेत -भौतिक सुख म्हणजे मोहमाया तर समाधान, प्रेम, माया, आदर, माणुसकी, शांतता हीच खरी कमाई आहे. उद्या काय होईल माहित नाही पण आजचा दिवस आपल्या हातात आहे म्हणून आजचा दिवस मनापसून, आनंदाने, प्रामाणिकपणे जगा. कारण कोणाचा कधी शेवटचा क्षण येईल हे सांगता येत नाही. दुसऱ्याची निंदा करण्यापेक्षा त्याचे कौतुक करावे. असे म्हणतात की जर एखाद्या विषयी चांगले बोलता येत नसेल तर वाईट ही बोलू नये.केवळ जन्माने माणूस होणे पुरेसे नाही, तर माणूस म्हणून जगणे महत्त्वाचे आहे. ही माणुसकीच माणसाला इतरांपेक्षा श्रेष्ठ बनवते. पैसा, पद, प्रतिष्ठा या बाह्य गोष्टी क्षणभंगुर असतात, पण माणुसकीचा गुण माणसाला चिरस्थायी बनवतो.माणुसकीने जगल्याने मिळणारे समाधान हे भौतिक सुखांपेक्षा मोठे असते.आजच्या धावपळीच्या युगात स्वार्थ आणि स्पर्धेमुळे माणुसकी हरवत चालली आहे. तंत्रज्ञानाच्या युगात माणसे एकमेकांपासून दुरावत आहेत. अशा वेळी माणुसकीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित करणे आवश्यक आहे.माणूस त्याच्या कृतीतून, विचारातून आणि संवेदनशीलतेतून श्रेष्ठ ठरतो. माणुसकी हाच त्याचा खरा दागिना आहे. म्हणून, आपण सर्वजण माणुसकीचे पालन करूनच खरे श्रेष्ठ माणूस बनू शकतो आणि एका चांगल्या समाजाची निर्मिती करू शकतो.दिवसभरातील प्रत्येक गोष्टीत काहीतरी चांगले शोधण्याचा प्रयत्न करा, कारण तुमचा दृष्टिकोनच तुमच्या आयुष्याची दिशा ठरवतो. इतरांच्या आयुष्याशी स्वतःची तुलना केल्याने फक्त असंतोष वाढतो. तुम्ही जसे आहात, त्यात स्वतःला स्वीकारण्यातच खरा आनंद आहे.थोडक्यात, आनंद हा बाहेर शोधण्यापेक्षा तो आपल्या अंतर्मनात शोधला पाहिजे. प्रत्येक लहान गोष्टीतील गोडवा चाखायला शिकलो की आयुष्य अधिक सुंदर वाटते.म्हणून माणसाने माणसांशी माणसा सम वागणे खूप हितकारक ठरेलं.



**-प्रा. नवनाथ बबन बांगर**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसाचे थैमान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ फेब्रुवारी :** लातूर शहर आणि जिल्हाभरात रविवारी रात्री आणि सोमवारी पहाटेच्या सुमारास अवकाळी पावसाचे आगमन झाले. सोमवारी दुपारनंतरही अवकाळीसदृश्य वातावरण दिसून आले. सोमवारी जिल्ह्यातील चाकूरसह काही भागात गारपीट झाली. या अवकाळी पावसाने आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मागच्या काही दिवसात मराठवाड्यात अवकाळी पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवलेजात होता. तो अंदाज काही प्रमाणात वास्तवात उतरताना दिसत आहे. रविवारी लातूर शहर परिसरात जोरदार वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. शहरात ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर रत्नेश्र्वर देवस्थानचा महाशिवरात्री यात्रा महोत्सव सुरु आहे. हजारोंच्या संख्येने नागरिक यात्रेचा आनंद लुटत असताना अचानक आलेल्या पावसाने अक्षरशः गोची केली. अनेकांना यात्रा अर्धवट सोडून परतावे लागले. सोमवारी पहाटेच्या दरम्यानही शहर परिसरात जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. आकाशात ढगाळ वातावरण असल्याने दिवसभर वातावरण दमट असल्याचे जाणवत होते. सोमवारी सायंकाळच्या दरम्यानही शहर परिसरात पावसाळीसदृश्य वातावरण अनुभवायला मिळाले. अगदी मे महिन्यात वाहतो तसा जोरदार वाराही वाहत होता. आकाशात बऱ्यापैकी ढग जमा झाल्याने सोमवारीही अवकाळी पावसाची चिन्हे दिसत होती. या अवकाळी पावसाने गहू, ज्वारीच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



# शिवमंदिरात हरिनामाचा गजर हीच सिद्धेश्वरांची लीला - हभप गुरुबाबा महाराज औसेकर

## सिद्धेश्वर मंदिरात चक्रीभजनाचा अलौकिक सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ फेब्रुवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालयात वर्षानुवर्षे चक्रीभजन केले जाते. या माध्यमातून शिवमंदिरातही हरिनामाचा गजर होतो, हीच ईश्वराची खरी लीला आहे. चक्रीभजनाची ही परंपरा नाथ संस्थानकडून कधीही खंडित होणार नाही, असे प्रतिपादन सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले.




लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी चक्रीभजनाची सेवा अर्पण केली. यावेळी गुरुबाबा महाराज म्हणाले की,हरी आणि हर हे एकच आहेत. ईश्वराने द्वैतभाव निर्माण केलेला नाही. आपणही असा भेद करणे चुकीचे आहे. असा भेद नसल्यामुळेच सिद्धेश्वरांच्या अर्थात शिवाच्या मंदिरात हरिचिंतन होत आहे.

भजनाच्या माध्यमातून आपण ईश्वराची आळवणी करतो.नवविधा भक्तीपैकी कुठल्याही मार्गाने ईश्र्वराची भक्ती करता येते.विशिष्ट देवांसाठी ठराविक भक्ती मार्ग नसतो.ज्या माध्यमातून तुम्हाला ईश्र्वर चिंतन करता येईल तो मार्ग स्वीकारावा, असे गुरुबाबा म्हणाले. ईश्वर हे अंतिम सत्य आहे. निर्गुण, निराकार ईश्र्वराला ज्या रूपात आपण पाहू तसाच तो भासतो. त्याला एका विशिष्ट रूपामध्ये आपण बंदिस्त करू शकत नाही. त्यामुळे मनात कुठलाही द्वैतभाव न ठेवता भक्ती करावी. हीच भक्ती आपल्याला मोक्ष मार्गाला घेऊन जाऊ शकते.हरी आणि हरामध्ये भेद करण्याची पात्रता आपल्यात नाही.त्यामुळे मिळालेल्या मानवी जन्माचे कल्याण करण्यासाठी हरिचिंतन करा, असा उपदेश सद्गुरु गुरुबाबा महाराजांनी केला.

गुरुबाबा महाराजांचे चक्रीभजन हा अलौकिक सोहळा असतो.तो पाहण्यासाठी आणि भजनाचा लाभ घेण्यासाठी हजारो भक्तांनी यावर्षीही श्री सिद्धेश्र्वर मंदिरात गर्दी केली होती.यावेळी देवस्थान विश्र्वस्त समितीच्या वतीने प्रशासक सचिन जांबुतकर,ज्येष्ठ विश्र्वस्त विक्रमतात्या गोजमगुंडे,अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे, विजयकुमार धायगुडे महादेव बन,संतोष भालेराव व मान्यवरांनी गुरुबाबा महाराजांचा सत्कार केला.

## विविध वृत्त...

### राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासातर्फे बैठकीचे आयोजन

**लातूर :** पदमभूषण जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे प्रणीत राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाच्या कार्यकारी अध्यक्षा कल्पना इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली भालचंद्र ब्लड बॅक येथे आज सकाळी दहा वाजता बैठक आयोजित केली असून या बैठकीस उपाध्यक्ष डॉ. कमल टावरी, दत्ता आवारी, विश्वस्थ सुखदेव सिंह विक्र, अन्सार शेख, डॉ. सोमनाथ रोडे, तारत्यासाहेब नंदवे, सूर्यवंशी, अॅड. संतोष गिल्डा उपस्थित राहणार आहे. या बैठकीमध्ये जिल्हा, तालुका तसेच ग्राम स्तरावर संगठन बांधणी, निकोप लोकशाही, लोकशिक्षण आणि लोक जागृती या चतुसूत्री आधारीत कार्ययोजना मांडली जाणार आहे. निःस्वार्थी भावनेने समाज कार्यासाठी योगदान देण्याची तयारी असलेले भ्रष्टाचार विरोधात ठाम भूमिका घेणारे जागरूक नागरिक महिला, युवक, युवती, शिक्षक, प्राध्यापक, वकील, शेतकरी, शेतमजूर, सामाजिक कार्यकर्ते यांनी या बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन तात्यासाहेब नंदवे, रामेश्वर सूर्यवंशी यांनी केले आहे

### २७ फेब्रुवारीपर्यंत सीसीआय खेरदी केंद्रावर कापूस विक्री करावी

**लातूर :** जिल्ह्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून चालू पीक वर्ष २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किमतीमध्ये (एमएसपी) कापूस खरेदी करण्याची अंतिम तारीख २७ फेब्रुवारी, २०२६ निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे कपास किसान पवर नोंदणीकृत असलेल्या सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी किमान आधारभूत किंमतीचा लाभ घेण्यासाठी लवकरात पव्दारे स्लॉट बुक करून २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जवळच्या सीसीआय खरेदी केंद्रावर आपला कापूस विक्री करावा, असे लातूर येथील सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक यांनी कळविले आहे.

### २४ फेब्रुवारीपासून आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन : कार्याध्यक्ष चाकूरकर

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींना कायमस्वरूपी रोजगार द्यावा, या मागणीसाठी २४ फेब्रुवारी २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना माहिती दिली आहे. पुढे बोलताना बालाजी पाटील चाकूरकर म्हणाले की यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, २०२४-२५ या कालावधीत सुमारे १ लाख २५ हजार युवकांनी शासकीय आस्थापनांमध्ये तर ५० हजार युवकांनी अशासकीय (खाजगी) आस्थापनांमध्ये ६+५ अशा एकूण ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. प्रशिक्षित युवकांच्या म्हणण्यानुसार, योजना सुरू करताना त्याच आस्थापनांमध्ये कायमस्वरूपी नियुक्ती देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रशिक्षण पूर्ण होऊनही कायमस्वरूपी रोजगाराबाबत ठोस निर्णय झालेला नाही. मागील तीन महिन्यांपासून अनेक युवक पुन्हा बेरोजगारीच्या संकटाला सामोरे जात असल्याचे संघटनेचे म्हणणे असल्याची त्यांनी सांगितले. प्रशिक्षित युवक-युवतींच्या संघटनेतर्फे राज्य सरकारने वाढता असंतोष लक्षात घेऊन अर्थसंकल्पीय अधिवेशनात कायमस्वरूपी रोजगाराबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा २४ फेब्रुवारीपासून हजारो युवक-युवती कुटुंबासह आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू करतील, असा इशारा ही बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला आहे. या पत्रकार परिषदेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मांदळे जिल्हा कार्यकारणी प्रमुख गोविंदराव टोम्पे, धीरज गुरमे, रवींद्र एकंबे, रवी भोसले, उमेश कांबळे, संतोष ढोबळे, विष्णू वैद्य, सुशील सिरसाठे, माळी मोनिका, तानाजी कांबळे यांची उपस्थिती होती.

# ‘ऑपरेशन ऑल आऊट’ अंतर्गत लातूर शहरात कडक नाकाबंदी

## वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ फेब्रुवारी :** लातूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री लातूर जिल्हा पोलिसांकडून शहरात ‘ऑपरेशन ऑल आऊट’ अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान शहरातील विविध ठिकाणी अचानक नाकेबंदी, वाहन तपासणी, संशयितांची चौकशी तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ही मोहीम पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शहरातील गांधी चौक, शिवाजीनगर, विवेकानंद चौक व एमआयडीसी या चारही पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी नाकेबंदी व तपासणी मोहीम राबविण्यात आली. ऑपरेशन ऑल आऊट’ अंतर्गत नाकेबंदी दरम्यान हुल्लडबाजी करत वाहन चालवणे, ट्रिपल सीट मोटारसायकल चालवणे, विनापरवाना वाहन चालवणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण २२ प्रकरणे नोंदवून सुमारे ३५,०००/- रुपयांचा दंड आकारण्यात करण्यात आला.

पोलीस स्टेशन एमआयडीसी हद्दीत देखील व्यापक वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण २८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. १७,४००/- रुपये दंड आकारण्यात करण्यात आला. तसेच फटाका सायलेन्सर लावलेल्या तीन बुलेट मोटारसायकली व ट्रिपल सीट चालविणारी तीन वाहने पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन येथे डिटेन करण्यात आले असून पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत नाकाबंदी दरम्यान २८ वाहणावर कार्यवाही करूण २४,००० रू दंड आकारण्यात आला व पोलीस ठाणे विवेकानंद चौक यांनी मोटर वाहन कायद्यान्वये आठ केसेस करून ५५०० दंड आकारला तसेच अवैधपणे शस्त्र घेऊन फिरणाऱ्या विरुद्ध शस्त्र अधिनियम प्रमाणे एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहीमेअंतर्गत शहरातील प्रमुख चौक, वर्दळीचे रस्ते तसेच शहराच्या प्रवेशद्वारांवर कडक नाकेबंदी करण्यात आली. संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींची तपासणी करण्यात आली. रेकॉर्डवरील गुन्हेगार तसेच तडीपार आरोपींवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ट्युशन परिसरात गस्त वाढविण्यात आली. वाहतूक नियमांचे पालन व्हावे यासाठी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांची तपासणी तसेच नियमबाह्य बदल केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.



लातूर जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सतत प्रयत्नशील असून भविष्यातही अशा प्रकारच्या अचानक नाकेबंदी, गस्त व विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच संशयास्पद बाबींची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# स्वच्छता हीच खरी देवपूजा आहे - डॉ. दशरथ भिसे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ फेब्रुवारी :** संत गाडगेबाबा यांचा विचार केवळ उपदेश नसून तो आचरणात आणणे अत्यावश्यक आहे. समाजसुधारणेसाठी अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणाचा प्रसार आणि विवेकबुद्धीचा विकास गरजेचा आहे. समाजपरिवर्तनासाठी केवळ शब्द नव्हे तर प्रत्यक्ष कृती, विवेकबुद्धी आणि शिक्षण आवश्यक आहे. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता व सामाजिक विषमता दूर करणे हेच संत गाडगेबाबा यांच्या कार्याचे खरे उद्दिष्ट होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्वच्छता हीच खरी देवपूजा आहे. ’ - असे मत प्रा. डॉ. दशरथ भिसे यांनी व्यक्त केले. दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाबळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. भिसे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रारंभी प्रा. ज्ञानदेव कांबळे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्यांनी संत गाडगेबाबा यांच्या शैक्षणिक कार्यावर विशेष भर दिला. त्यांनी सांगितले की संत गाडगेबाबा यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. शाळा, वसतिगृहे व शिक्षणसंस्थांसाठी निधी संकलन करून त्यांनी वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीबरोबरच समाजउन्नतीसाठी करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सांस्कृतिक विभाग प्रा. डॉ. पांडुरंग मुंढे यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, प्रा.शितल खोत, प्रा. नंदा खरटमल, डॉ. मीनाक्षी कोंगे, डॉ. अंकिता वाडकर, स्टाफ सचिव प्रा. चंद्रकांत मोरे, प्रकाश मेहकर, डॉ. माधव गायकवाड, प्रा. विवेक गोस्वामी, डॉ.कांतराव पोले, डॉ.सुरेशकुमार कांबळे, प्रा. विवेक कदम, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ.इंग्रजीत शिंदे, डॉ.अजित भांजी, राजकुमार कांबळे, सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### दयानंदच्या चांडेश्वर येथील रासेयो शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर च्या राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस.एस.) विभागातर्फे दि. १४-०२-२०२६ ते २०-०२-२०२६ या कालावधीत सात दिवसीय निवासी विशेष वार्षिक युवक शिबिराचे ‘‘शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास’’ या विषयांतर्गत आयोजन मौजे चांडेश्वर, ता. जि. लातूर येथे करण्यात आले होते. २० फेब्रुवारी रोजी याच प्रसंगी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून रासेयो विभागाच्या सात दिवसीय निवासी विशेष वार्षिक युवक शिबिराचा समारोप करण्यात आला.

# देवणी येथील दुकानास आग;लाखोंचे नुकसान

## अग्निशामक दलाच्या तत्परतेने पुढील अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २३ फेब्रुवारी :** येथील लासोना चौकातील आप्पाजी कॉम्प्लेक्स येथील दुकान क्र.१७ या दुकानास सोमवारी (दि.२३) रोजी रात्री १:३० वाजता अचानक आग लागली. तत्परतेने ही आग नियंत्रणात आणण्यात आली यामुळे पुढील अनर्थ टळला.



या आगीमध्ये टेबल ,खुर्ची, काउंटर व इलेक्ट्रिक साहित्य मिळून असे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या दुकानाला लागलेल्या आगी बाबत देवणी नगरपंचायतीच्या अग्निशामक दलास भ्रमणध्वनी केल्यानंतर तात्काळ अग्निशामक दलाची गाडी व त्यांचे कर्मचारी तत्परतेने हजर राहून ही आग मोठ्या शर्तीने एका तासात आटोक्यात आणली.

यावेळी अग्निशामक दल देवणी नगर पंचायतीचे नाजीम मोमीन, मुनाफ शेख व जाहेद उंटवाले, ताजोद्दीन बुदलेघर, ईमरान मोमीन आदींसह उपस्थित नागरिकांनी ही आग नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली.

दुकानदार मारोती बाबुराव टेकाळे व शोभा मारोती टेकाळे यांनी देवणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अचानक लागलेल्या आगे मध्ये दुकानातील लाखो रुपयाचे नुकसान झाले असून महसूल प्रशासनाकडून पंचनामा करून शासनाकडून आर्थिक मदत व सहकार्य मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण कांबळे यांच्याकडून आग लागलेल्या दुकानाचे रीतसर पंचनामा करण्यात आले आहे. याबाबत देवणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया चालू होती.


### जाहीरनामा

**श्रीमती एम.एस. निकम, १० वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात**

वारसा प्रमाणपत्र क्र. २९५/२०२६
सिध्दार्थ वि. निरंक
निशाणी क्रमांक ०६

ज्यापेक्षा **मयत शालूबाई बाबुराव गोपाळे** यांचा दिनांक १६.१२.२०२३ रोजी **बाभळगांव, ता.जि. लातूर** येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार **सिध्दार्थ बाबुराव गोपाळे, वय ४६ वर्षे, रा. गौरीशंकर सोसायटी, बाभळगांव, ता.जि. लातूर** यांनी मयत **शालूबाई बाबुराव गोपाळे** यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात मयत **शालूबाई बाबुराव गोपाळे** यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नांव नोंदणी करण्यासाठी व ईतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज तारीख २३.०२.२०२६**
**पुढील तारीख ०१.०४.२०२६**

स्वाक्षरित/- **(एम.डी.सूर्यवंशी) कनिष्ठ लिपीक,**

स्वाक्षरित/- **सहा अधीक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, लातूर**

### जाहिरप्रगटन

**श्रीमती एम.एस. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश व स्तर, लातूर यांच्या न्यायालयात**

वारसा प्रमाणपत्र अर्ज क्र. २९६/२०२६
संगीता वि. निरंक
निशाणी कमांक ६

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्यापेक्षा मयत **गोविंद गणपती समदरले** यांचा मृत्यु दिनांक २४/०७/२०१४ रोजी मुशिराबाद ता. जि. लातूर येथे झाला आहे. उपरोक्त प्रकरणात अर्जदार **१. संगीता गोविंद समदरले २. ज्ञानेश्र्वर गोविंद समदरले (सगर) ३. संतोष गोविंद समदरले (सगर) सर्व रा. मुशीराबाद ता. जि. लातूर** यांनी मयत गोविंद गणपती समदरले यांचे वारस असले बाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात **मयत गोविंद गणपती समदरले** याच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नाव नोंदणी करण्यासाठी व इतर कामासाठी त्याच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत किंवा पुढील तारीख ३०/०३/२०२६ रोजी पर्यंत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्कशाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख २३/०२/२०२६.

स्वाक्षरित/- **(एस. बी. दुर्गे) कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर, लातूर**

स्वाक्षरित/- **सहा अधीक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, लातूर**

## अग्रलेख...

# आता कळेल वेदनेचा अर्थ

इस्लाममध्ये रमजान या नवव्या महिन्याला अत्यंत महत्त्व आहे. हा महिना मांगल्याचे प्रतीक असल्याने त्याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात. पवित्र कुराणचे अवतरण याच महिन्यात झाले. रमजानचे पहिले दशक कृपेचे, दुसरे क्षमेचे तर नरकापासून मुक्ततेचे मानले जाते. त्यामुळे या काळात इबादत करणाऱ्यास अल्लाह क्षमादान देईल आणि नरकापासून मुक्तता देईल. त्यामुळेच अल्लाहचे बंदे संसार, व्यापाराचा त्याग करून अल्लाहला शरण जातात. अशा या पवित्र महिन्यात शांतता असावी, अशी अपेक्षा निदान इस्लामिक स्टेट ऑफ पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशांकडून आहे. कारण आम्हीच इस्लामचे रखवाले असल्याची आवई हे देश देत असतात. मात्र, धर्माच्या नावावर या दोन्ही देशांमध्ये माणसांचे जेवढे जीव घेतले गेले आहेत तेवढे अन्य कुठल्याही देशामध्ये आढळणार नाही. विशेष म्हणजे हे दोन्ही देश कधीकाळी अखंड हिंदुस्थानचेच तुकडे होते. हिंदू आणि बौद्ध राजांच्या राजवटी कधीकाळी अफगाणिस्तानात सुखाने नांदत होत्या. खैबर आणि बोलन खिंडींच्या अलिकडचा भागही, जो आज पाकिस्तान आहे, भरभराटीस आलेला होता. पण, धर्मांधतेने दोन्ही देशांचा ऱ्हास केला.

जगातील छोटे छोटे देश विकासाचे उंच उंच इमले बांधत असताना साधन संपत्तीने समृद्ध असतानाही पाकिस्तान-अफगाणिस्तान दरिद्री अवस्थेत खितपत पडलेले आहेत. कारण काय तर एकच आणि ते म्हणजे धर्मांधता. भूतकाळात अफगाणिस्तानने सहिष्णूता, शांततेचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुस्थानचा प्रचंड छळ केला. सबुक्तगीन, गझनी, घोरी, खिल्जी, मोघल आणि अब्दाली या क्रूर शासकांनी लक्षावधी नागरिकांची कत्तल करीत अगणित संपत्ती लुटून नेली. पण, लुटारूंच्या या देशाची आजची परिस्थिती काय आहे? आज जवळपास ४५ वर्षांपासून म्हणजे १९७९ मधील रशियाच्या आक्रमणानंतर अफगाणिस्तान जगापासून तुटला आहे, कंगाल-भंगार झाला आहे. धर्माच्या नावावर लुटमार करणाऱ्या दरोडेखोरांच्या नशिबी आणखी काय येणार? हिंदुस्थानची कबर खोदण्याची स्वप्ने पाहणारे हे दोन्ही देश आता त्याच कबरीच्या काठावर उभे आहेत. हा सर्व काळ भूतकाळ मांडण्याचे कारण एकच की, जसे तुम्ही कराल, तसेच तुम्हाला भरावे लागणार आहे. भारतीय जीवन दर्शनातील 'यादृशं कुरूते कर्म तादृशं फलमृश्ते।' हा संस्कृत श्लोकसुद्धा हेच दर्शवितो. रमजानचा पवित्र नववा महिन्याचे उपवास सुरू आहेत. हा महिना पवित्रता, त्याग, संयम, नैतिकता आणि बंधुत्वाची शिकवण देणारा आहे. थोडक्यात हा महिना म्हणजे अल्लाहच्या जवळ जाण्याचा आणि स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणारा आहे. या पवित्र महिन्यात पाकिस्तानने मात्र अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करून २० पेक्षा जास्त निष्पाप नागरिकांचे बळी घेण्याचे सैतानालाही लाजवेल, असे कृत्य केले. रविवारी रात्री नागरिक झोपेत असताना पाकिस्तानच्या लढाऊ विमानांनी नानगाहर आणि पख्तिया प्रांतात तीन हल्ले केले. या हल्ल्यात महिला आणि मुलांसह झोपेत असलेल्या नागरिकांचा मृत्यू झाला. एक मदरसा, एक मशिद आणि काही मातींच्या घरांवर शक्तिशाली बॉम्ब पडल्याने नागरिक मलब्यात दबून ठार झाले. २०२१ मध्ये तालिबान सत्तेवर आल्यापासून दोन्ही इस्लामिक बंधू असलेले हे दोन्ही देश एकमेकांच्या जिवावर उठले आहेत. खरे तर तालिबानचे पालनपोषण करणारा पाकिस्तानच आहे. या इस्लामिक बरादरचा उपयोग हिंदुस्थानच्या विरोधात विशेषतः जम्मू-काश्मिरात करण्याचे कुटिल मनसुबे पाकिस्तानने आखले होते. पण, झाले उलटेच. भारताचे तर कुणी काहीही वाकडे करू शकले नाही; उलट हे दोन्ही देश गृहयुद्धात अडकले आहेत. १९९० च्या दशकात काश्मिरात जेव्हा दहशतवादाला सुरुवात झाली तेव्हा अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांनाच घुसविण्यात आले होते. अकबर भाई हे त्यापैकी एक नाव. रशियन सैन्य परत गेल्यानंतर या दहशतवाद्यांना काही कामधंदा नसल्याने पाकिस्तानी सैन्याने त्यांना काश्मिरात पाठविले होते. हा अकबर अफगाणिस्तानातील हिकमतयार या दहशतवादी गटाचा प्रमुख गुलबदीन हिकमतयार याचा अंगरक्षक होता. १९९३ मध्ये सोपोरजवळ भारतीय जवानांनी अकबरला ठार केले. १९९६ मध्ये तालिबानने काबूल जिंकल्यानंतर काश्मीर खोऱ्यात हिंसाचार वाढला होता. आकडेवारी हेच सांगते. गेल्या चार दशकांत जेवढे नागरिक, सुरक्षा जवान आणि दहशतवादी हिंसाचारात ठार झाले त्यापैकी ४० टक्के १९९६ ते २००१ या काळात मारले गेले. या काळात अफगाणिस्तानात तालिबान सत्तेवर होते. अमेरिकेवरील हल्ल्यानंतर तालिबानला सत्तेवरून हाकलून लावल्यानंतर परिस्थिती बदलली. अफगाणी दहशतवाद्यांनी नंतर काश्मीरकडे वळूनही पाहिले नाही. तसेही १९९० पासून काश्मीर खोऱ्यात फक्त ८४ अफगाणी दहशतवाद्यांची उपस्थिती दिसून आली. यापैकी काही चकमकीत ठार झाले तर काही पळून गेले. त्यानंतर जवळपास १० वर्षे अफगाणिस्तानात शांतता होती. २०२१ मध्ये पुन्हा तालिबान सत्तेवर आल्याने पाकिस्तानने पुन्हा एकदा तालिबान्यांच्या मदतीने काश्मिरात आग लावण्याचे प्रयत्न केले. पण, हे तालिबानी काही १९९० च्या काळातील नव्हते. धर्माच्या नावावर हिंसा केली तर मरणच नशिबी येणार, सुख नव्हे याची जाणीव या पुढारलेल्या तालिबान्यांना झाली. पैसा, संपत्ती, सत्ता आणि पळून गेलेल्या अमेरिकन सैनिकांची शस्त्रे व वाहने हाती लागल्याने ही सर्व साधने आणि सुखाचा पाकिस्तान म्हणेल म्हणून त्याग करायला हे तालिबानी काही मूर्ख आणि बावळट नव्हते. तसेच या तालिबान्यांचा मूळ पिंड हा पेंढाऱ्यांचाच आहे. सत्तेमुळे सुखावलेले आणि खुर्चीसाठी चटावलेले तालिबान आपल्या तालावर नाचत नसल्याचे पाहून पाकिस्तानचे डोके फिरले आणि त्यांनी अफगाणी निर्वासितांना हाकलून देण्यास सुरुवात केली. गेली तीन दशके पाकिस्तानात राहणाऱ्यांना अफगाणींना हाकलल्याने दोन्ही देशांत निर्माण झालेला तणाव अजूनही कायम आहे. जमिनी युद्धात तरबेज असलेल्या तालिबानकडे हवाई युद्ध क्षमता नाही तसेच क्षेपणास्त्रेही नाहीत. त्यामुळे हानी टाळण्यासाठी पाकिस्तानने २०२१ पासून अफगाणिस्तानवर पाच वेळा हवाई हल्ले करून शेकडो नागरिकांचा बळी घेतला. पहिला हल्ला एप्रिल २०२२, दुसरा मार्च २०२४, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२५ मध्ये दोन तर २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पाचवा हवाई केला.

प्रतिहल्ला करण्याची क्षमता तालिबानकडे नाही. परिणामी योग्य वेळ पाहून आत्मघाती हल्ला अथवा सीमावर्ती भागात तैनात असलेल्या सैनिकांवर अचानक धावा बोलून पाकिस्तानची जेवढी मनुष्यहानी होईल तेवढी करण्याचा प्रयत्न तालिबान करीत असतो. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या धुमश्चक्रीत पाकिस्तानचे ५० पेक्षा जास्त सैनिक ठार झाल्यानंतर प्रचंड तणाव निर्माण होऊन व्यापार ठप्प झाला. दोन्ही देशांमध्ये २६०० किलोमीटर लांबीची सीमारेषा आहे. व्यापार बंद झाल्याने दोन्ही देशांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. अफगाणिस्तानला भारत चाबाहार बंदरामार्फत खाद्यवस्तू आणि औषधांचा पुरवठा करीत आहे. मात्र, सीमा बंद असल्याने पाकिस्तानी व्यापारी हवालदिल झाले आहेत. या हल्ल्यानंतर तालिबान शांत बसणार नाही, एवढे मात्र नक्की. निष्पाप मुले आणि महिलांचा हल्ल्यात मृत्यू झाल्याने चवताळलेल्या तालिबानने या हल्ल्यांचा योग्य ठिकाणी आणि योग्यवेळी सूड घेण्याची घोषणा केली आहे. परिणामी आणखी एक हल्ला आणि प्रतिहल्ला अशी सूड उगविण्याची मालिका कायम राहणार आहे. कधीकाळी जो पाकिस्तान सीमापार दहशतवादाचा वापर करीत हिंदुस्थानला जखमा करीत होता त्याच जखमा आता तालिबान पाकिस्तानला करीत आहे. ज्या दहशतवादरूपी भस्मासुराला आशीर्वाद दिला, पालनपोषण केले तोच आता पाकिस्तानवर उलटला आहे. दहशतवादी हल्ल्यांमध्ये सैनिक आणि निष्पाप नागरिक ठार झाल्यानंतर झालेल्या जखमांच्या वेदना काय असतात, हे आता पाकिस्तानला कळू लागले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# प्रकरण निखिल गुप्ताचे!

न्यूयॉर्कच्या मॅनहटन न्यायालयाच्या दालनात घडलेल्या एका घटनेचे साद-पडसाद नवी दिल्लीतील सत्तेच्या दालनात प्रदीर्घ काळ ऐकू येत राहतील. न्यू यॉर्कमध्ये राहणाऱ्या ५४ वर्षीय निखिल गुप्ता या भारतीयाने एक खलिस्तानी नेता गुरपतवंतसिंग पन्नू याच्या हत्याकांडाच्या कटात सामील असल्याचा कबुलीजबाब या न्यायालयात दिला. अमेरिकेच्या न्यायप्रणालीत एक फार चांगली पद्धत आहे. एखादा गुन्हा घडल्यानंतर त्याची चौकशी पूर्ण करून न्यायालयात खटला दाखल केला जातो. आरोपीच्या विरोधात असलेला सारा पुरावा आरोपीस दाखविला जातो आणि त्यास गुन्हा कबूल करण्याची संधी दिली जाते. याचे दोन फायदे होतात. आरोपीने गुन्हा कबूल केला तर त्याला कमी शिक्षा दिली जाते. परिणामी त्याला कमी शिक्षा भोगावी लागते आणि दुसरा फायदा म्हणजे खटला चालविण्यासाठी लागणारा वेळ संपुष्टात येतो.

**प्रागमध्ये अटक** : न्यू यॉर्कमध्ये राहणाऱ्या आणि अमेरिकन नागरिक असणारा खलिस्तानी नेता पन्नू याच्या हत्येच्या कटाचे प्रकरण मागील काही काळापासून गाजत होते. त्या प्रकरणात निखिल गुप्ता हा एक आरोपी होता. मागील वर्षी त्याला झेकोस्लाव्हाकियाची राजधानी प्राग येथे अटक करण्यात आली. नंतर त्याचे प्रत्यार्पण अमेरिकेकडे करण्यात आले. प्रारंभी गुप्ताने आपल्यावरील सर्व आरोपांचा इन्कार केला होता.

**तीन आरोप** : पन्नूच्या हत्येचा कट करणे, त्यासाठी मारेकरी निवडण्याचा कट करणे आणि यासाठी पैसा पुरविणे असे तीन आरोप गुप्तावर ठेवण्यात आले होते. अमेरिकन चौकशी अधिकाऱ्यांनी यासदर्भात भक्कम पुरावा गोळा केला होता. तो गुप्ताला दाखविण्यात आल्यानंतर त्याने हे तिन्ही आरोप स्वीकारण्याचा निर्णय घेतला. आरोप नाकारून नंतर खटला चालून तो दोषी ठरला असता तर त्याला ४० वर्षे कारावासाची शिक्षा झाली असती. आता त्याला २१ ते २४ वर्षे शिक्षा होईल. याबाबतचा आदेश २९ मे रोजी दिला जाईल.

**विकास यादव** : निखिल गुप्ताने एक भारतीय अधिकारी विकास यादवच्या सांगण्यावरून हे केले. या भारतीय अधिकाऱ्यास नवी दिल्लीतील एक अधिकारी आदेश-निर्देश देत होता, असे अमेरिकन चौकशी संस्था एफबीआयने म्हटले आहे . भारताने याचा स्वाभाविकच इन्कार केला आहे. या प्रकरणाशी आमचा काहीही संबंध नाही, असे भारताने म्हटले आहे. विकास यादव केंद्रीय राखीव पोलिस दलात होता. नंतर त्याला प्रतिनियुक्तीवर'रॉ'कडे पाठविण्यात आले होते आणि 'रॉ'ने त्याला न्यू यॉर्कमध्ये नियुक्त केले होते. या विकास यादवने पन्नू याच्या हत्येसाठी मारेकरी निवडण्याची जबाबदारी निखिल गुप्ताकडे सोपविली होती आणि निखिल गुप्ताने या हत्येची सुपारी ज्या अमेरिकन नागरिकाकडे सोपविली; तो मारेकरी वगैरे नव्हता, तर अमेरिकन गुप्त अधिकारी होता. निखिल गुप्तासोबत टॅक्सीत झालेले त्याचे संभाषण, पैशाची देवाणघेवाण या सर्व बाबी त्याने कॅमेऱ्याने टिपल्या. नंतर त्या सर्व पुरावा म्हणून न्यायालयात सादर केल्या. त्यातून या साऱ्या प्रकरणाचे बिंग फुटले.

**यादवचा राजीनामा** : पन्नू प्रकरणाचे पडसाद अमेरिकन वृत्तपत्रांमध्ये उमटू लागल्यावर भारत सरकारने विकास यादवला माघारी मायदेशी बोलाविले. अमेरिकन प्रशासनाने विकास यादवच्या प्रत्यार्पणाची मागणी भारत सरकारकडे केली आहे. मात्र आता विकास यादवने केंद्र सरकारच्या नोकरीतून राजीनामा दिला असून तो सध्या काय करीत आहे, याची फारशी माहिती समोर आलेली नाही. मधल्या काळात दिल्लीतील एका न्यायालयाने यादवच्या विरोधात गैरजमानती वॉरंट जारी केले होते. नंतर ते रद्द करण्यात आले. यादव याला अमेरिकेकडे न सोपविण्याची भारत सरकारची भूमिका आहे आणि ती बरोबरही आहे. पण, आता निखिल गुप्ताच्या कबुलीजबाबानंतर अमेरिका यादवचा ताबा मिळविण्यासाठी आपला दबाव वाढवेल, असे मानले जाते.

**गुप्ताची भूमिका** : निखिल गुप्ताने आपण हे सारे काम विकास यादव या भारतीय अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून केले, असे एफबीआयला सांगितले आहे. कॅनडातील खलिस्तानी नेता निज्जर याची हत्या अशाच प्रकारे करण्यात आल्याचे त्याने आपल्या कबुलीजबाबात सांगितले आहे. पन्नूच्या हत्येची सुपारी आपल्याला यादवने दिली होती. मात्र ही हत्या पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याच्या दरम्यान करण्यात येऊ नये, असेही आपल्याला सांगण्यात आले होते, असे मॅनहॅटन न्यायालयात गुप्ताने सांगितले आहे. गुप्ताच्या या कबुलीजबाबाचा आधार घेत अमेरिका आता विकास यादवच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न करणार असल्याचे समजते. अर्थातच हे होण्याची शक्यता नाही. कोणत्याही परिस्थितीत यादवला अमेरिकेकडे सोपविले जाणार नाही. कारण त्यातून नव्या समस्या तयार होतील, याची भारत सरकारला जाणीव आहे.

**चूक भोवली** : केंद्रीय राखीव पोलिस दलाचा माजी अधिकारी विकास यादवचा नवखेपणा या प्रकरणात सर्वांना भोवला, असे समोर येत आहे. विकास यादव हा नवखा अधिकारी. त्याने निवडलेला निखिल गुप्ता हाही या क्षेत्रात नवखाच होता. गुप्ता व विकास यादव या दोघांनी न्यू यॉर्कमध्ये पन्नू याच्या हत्येचा कट का व कसा रचला, याची भारत सरकारला कल्पना आलेली नाही. विकास यादव नवी दिल्लीत कोणत्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होता, याचीही भारत सरकारला कल्पना नसल्याचे सांगितले जाते. एफबीआयजवळ मात्र 'ते उच्चपदस्थ नाव' असल्याचे सांगितले जाते. एफबीआयने सध्या तरी ते जाहीर न करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, राष्ट्रपती ट्रम्प ते जाहीर करणारच नाहीत, असे मात्र म्हणता येणार नाही. विकास यादव भारतात परतल्याने तो तर बचावला. पण, या प्रकरणात हकनाक बळी गेला तो मात्र निखिल गुप्ताचा. गुप्ता मागील वर्षभरापासून तुरुंगात आहे आणि आता तर त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली असल्याने त्याला २०-२२ वर्षे अमेरिकन कारागृहात राहावे लागणार आहे. आता हे प्रकरण निखिल गुप्तावरच थांबेल, असे भारत सरकारला वाटत असले, तरी ते होण्याची शक्यता कमी आहे. अमेरिकेने हा सारा विषय अतिशय उच्च स्तरावर भारत सरकारकडे लावून धरला होता, अशी माहिती अमेरिकेतील काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली होती. अमेरिकेच्या या भूमिकेचा विचार केल्यास, आता गुप्ताचा कबुलीजबाब अमेरिका किती आणि कोणत्या स्तरावर उपस्थित करणार, याकडे भारत सरकारचेही लक्ष लागले आहे.

**मनोबल उंचावले?** : मॅनहटन न्यायालयात निखिल गुप्ता कबुलीजबाब देत असताना, तेथे काही खलिस्तान समर्थक उपस्थित होते. त्यांना एकप्रकारे अभय मिळाले आहे. भारताविरोधात गरळ ओकणाऱ्या एका खलिस्तानी नेत्यासाठी म्हणजे पन्नूसाठी एका भारतीयास म्हणजे निखिल गुप्ताला कारागृहात जावे लागले यापेक्षा या खलिस्तानींसाठी आणखी कोणती चांगली घटना असू शकते?

अमेरिका, कॅनडा, ब्रिटन या तीन देशात तरी शीख लोकसंख्या भरपूर आहे आणि या देशांमध्ये खलिस्तानी चळवळीची पाळेमुळे रुजली गेली आहेत. या तिन्ही देशांची सरकारे आपल्या बाजूने आहेत असा एक संदेश निज्जर व पन्नू प्रकरणात गेला आहे. याने या देशांमध्ये खलिस्तानी चळवळ पुन्हा सुरू होईल काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. तसे झाल्यास भारत सरकारसाठी ती एक नवी डोकेदुखी ठरेल.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# वाहनांची वेगमर्यादा लॉक करा!

वाहन आज मानवाची मूलभूत गरज बनली आहे. पण याच वाहनांमुळे वाढत असलेले अपघातही चिंताजनक ठरले आहेत. १०० पैकी ९९ अपघात मानवी चुकांमुळे घडतात. यात वेगाने वाहन चालविणे हे प्रमुख कारण आहे. एसटी महामंडळाने अपघात घडू नये म्हणून आपल्या सर्वच वाहनांची वेगमर्यादा ताशी ६० ते ८० किलोमीटर यानुसार चक्क लॉक करून ठेवली आहे. परिणामी एसटीचा प्रवास सर्वात सुरक्षित ठरला आहे. एसटी आपल्या वाहनांची वेगमर्यादा लॉक करून ठेवते, त्याच धर्तीवर खाजगी वाहनांना मोकळे रान का? हा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. त्याचा विचार करता प्रत्येक वाहनाची वेगमर्यादाही लॉक करायची वेळ आलेली आहे. लोक शिकलेले असोत किंवा अशिक्षित ते नियम मोडण्यातच धन्यता मानतात. शिवाय कायद्यातील पळवाटा पाहता आरोपी चालकाला फाशी झालेले उदाहरण भारतात तरी उपलब्ध नाही. हे वास्तव पाहता भारत सरकारने स्वतः पुढाकार घेत कारखान्यातून रस्त्यावर येणाऱ्या प्रत्येक वाहनाची वेगमर्यादा लॉक करण्याचे आदेश द्यायला हवेत. समजा एखाद्याला वेगमर्यादा लॉक केलेले वाहन नको असल्यास त्याच्याकडून १० पट कर घेतला जावा. एवढेच नव्हे, तर त्याच्या विम्याची रक्कमही तेवढ्याच पटीने वाढविण्यात यावी. ही मागणी अनेकांना हास्यास्पद वाटेल, पण हीच काळाची गरज आहे. भारतातील लोकांची मानसिकता भीतियुक्त आदर राखणारी आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठीत नाही का, भारतीय लष्कराच्या परिसरातून जाताना सैनिकांच्या धाकापोटी का असेना तिथे वाहन चालक हळुवारपणे वाहन चालवितात. परिणामी तिथे अपघात घडत नाहीत.



मग इतरत्र हाच नियम लागू केल्यास मनुष्यबळाची गरज वाढेल. तेवढे मनुष्यबळ पुरविणे सरकारला शक्य नाही. अशावेळी वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनाच एसटी महामंडळाच्या धर्तीवर वेगमर्यादा लॉक करण्याचे निर्देश सरकारने द्यायला हवेत. ज्या कंपन्या याला जुमानणार नाहीत, त्यांच्या वाहन विक्रीवर देशात बंदी टाकावी. भारतात २०२५ या वर्षात सुमारे ४ लाख ८० हजार अपघात झाले आहेत. याचा अर्थ दररोज १३१५ अपघात घडले. महाराष्ट्रात २०२५ मध्ये ३६ हजारांपेक्षा जास्त अपघात झाले. त्यात १५,५४९ लोकांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला आहे. देशातील बहुतांश गावात वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणण्यासाठी गतिरोधक लावले जातात. पण दोन गतिरोधकांच्या मध्ये जो वेग वाढतो तोही जीवघेणा ठरत असतो. या स्थितीचा अभ्यास करता वाहनांची वेगमर्यादा लॉक झाल्यास चालकाने कितीही प्रयत्न केला तरी ती गाडी वायुवेगाने धावणारच नाही. तसे पाहता वायुवेगाने वाहन चालवून लोकांना चंद्रावर जायचे नसते. त्यांना तर रस्त्यावर थरार लोकांना दाखवायचा असतो. तो थरार पूर्ण होतो, पण निष्पाप पादचारी मरतात, त्याचे काय? मेलेला माणूस केवळ एक असला, तरी त्याच्यावर अवलंबून असलेले संपूर्ण कुटुंब उघड्यावर येते. एका चालकाच्या चुकीने १० ते १२ लोकांचे आयुष्य बरबाद होते. शिवाय आरोपी चालकाला मोठी शिक्षाही दिली जात नाही. तो तर 'तांत्रिक चूक होती' असे सांगून पुन्हा दुसरा अपघात करायला मोकळा होतो. तिकडे ज्याचा जीव गेला त्याला कधीच न्याय मिळत नाही. ही कटू वास्तविकता पाहता दुचाकी, चार चाकी आणि तीन चाकी सर्वच वाहनांची वेगमर्यादा लॉक करण्याची वेळ आलेली आहे. रस्ता ही सार्वजनिक मालमत्ता आहे. ती खाजगी मालमत्ता नाही. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्यांसाठी कडक नियमावली यायलाच हवी. वेगमर्यादा लॉक झाल्यास वायुवेगाने होणारे अपघात थांबतील. वाहन हे सुरक्षित प्रवासाकरिता आहे. ते रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांना चिरडून स्मशानभूमीत नेणारे नाही; प्रत्यक्षात आज वाहन हे निष्पाप लोकांना स्मशानभूमीत पोहोचविणारे यमदूत ठरले आहेत. अशा यमदूतरूपी वाहन चालविणाऱ्या चालकांना धाकात ठेवायचे झाल्यास वेगमर्यादेला लॉक हाच सर्वोत्तम उपाय ठरू शकतो. याला काही लोक नक्कीच विरोध करतील. पण ज्यांच्या घरचा कर्ता पुरुष रस्ता अपघातात देवाघरी गेला, ते मात्र याला नक्कीच समर्थन देतील. शेवटी, रस्ता हा सार्वजनिक असल्याने त्यावरून चालणारी प्रत्येक व्यक्ती सुखरूप घरी जायलाच हवी. एसटी महामंडळाने वेगमर्यादा लॉक केल्याने त्यांचे काहीच बिघडलेले नाही; उलट त्यांचा प्रवास सुरक्षित झाला आहे. शिवाय बहुमूल्य इंधनाची नासाडीही थांबली आहे. मग आपलाही प्रवास सुरक्षित व्हावा, असे ज्यांना वाटत असेल त्यांनी नक्कीच वेगमर्यादेला लॉक करण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेवटी 'वेगाला आवरा जिवाला सावरा' हाच फॉर्म्यूला आपल्याला पृथ्वीवर जिवंतपणीच स्वर्गसुख मिळवून देणारा ठरू शकतो.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# गोपाला...गोपाला...देवकीनंदन गोपाला

विदर्भ ही संतांची भूमी आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात शेणगाव (शेंडगाव) या गावी २३ फेब्रुवारी १८७६ रोजी संत गाडगे महाराजांचा जन्म झाला. 'जाती न पूछिये संत की, पूछ लीजिए ज्ञान.' असे जे म्हटलेले आहे ते बरोबरच आहे. नदीचे मूळ आणि ऋषीचे कुळ विचारू नये, तेही योग्यच आहे. पूर्वीचा समाज बहुतांश अशिक्षित होता. संत कुठल्याही जातीत जन्मलेले असले, तरी त्यांनी जातिपातीचा विचार न करता योग्य सन्मान दिलेला होता. संत गाडगे महाराज यांचे नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचे वडील लहानपणीच दारूच्या व्यसनामुळे आजारी होऊन वारले. भविष्यात महाराजांनी आपल्या कीर्तनातून दारूच्या व्यसनाविरोधात ते विचार मांडलेले आहेत. वडिलांच्या निधनानंतर त्यांची आई त्यांना घेऊन त्यांच्या मामाच्या घरी दापुरे येथे आली. मामाच्या घरी राहून काबाडकष्ट करण्याची सवय डेबूजी यांना लागलेली होती. काबाडकष्ट करावे, शेतात राबावे आणि मिळेल तो भाकर-तुकडा खावा. असे त्यांचे बालपण आणि तरुणपण गेले. यथावकाश त्यांचे लग्न झाले. मुले झाली. हे सर्व होत असताना त्यांनी समाजामध्ये चाललेल्या रूढी-कुप्रथा बघितलेल्या होत्या. व्यसनाधीनता बघितली होती. सावकाराच्या पाशामध्ये भरडले जाणारा समाजही बघितला होता.

डेबूजींना लहानपणापासूनच भजन म्हणण्याची आवड होती. मंदिरात होणाऱ्या भजन-कीर्तनात ते सहभागी व्हायचे. पहाटेच उठावे, नदीवर स्नान करावे, देवाचे दर्शन घ्यावे आणि मगच आपल्या शेतीवाडीच्या कामांना हात लावावा, असे त्यांचा नित्यक्रम होता. पहाटेच्या वेळी जर अंधाऱ्या रस्त्यांवरून कोणी भजन म्हणत जात असेल तर लोक म्हणायचे हा नक्कीच डेबूजी असणार.

एकदा ऋणमोचन या तीर्थक्षेत्री नेहमीप्रमाणे ते पूर्णा नदीमध्ये आंघोळीला गेले असता त्यांच्या कमरेला बांधलेला एक रुपया नदीच्या पात्रात पडला. खूप शोधूनही तो मिळाला नाही. त्याच वेळेला डेबूजींच्या मनामध्ये विचार आला की असे कितीतरी जीवन या कालप्रवाहामध्ये सामावून गेले असतील. ते भानावर आले आणि यातूनच त्यांच्या मनामध्ये पुढील कार्याची रूपरेषा ठरत गेली. पत्नी, आई, मुली यांना सोडून ते घराबाहेर पडले. ते गावोगावी फिरू लागले. शेतकऱ्यांच्या शेतात जावे, त्याला म्हणावे भाकरी देतो का? त्याने म्हटले की फुकटचे कशाला खातो. काही काम का करत नाही? तर, डेबूजींनी त्याला म्हणावे सांग काय करू आणि डेबूजी लगेच त्याच्या शेतामध्ये काम करू लागत. तो भाकरी घेऊन येतपर्यंत डेबूजी तिथून निघून जात. कोणाच्या घरी जात, भाकरी मागत. त्याने काही काम का नाही करत म्हटले तर म्हणायचे की कुऱ्हाड द्या, तुमची लाकडं फोडून देतो. कुंभाराच्या घरी गेले तर त्याची माती पायाने तुडवून देत. कोणाचे अंगण झाडून देत. मिळेल तो भाकर-तुकडा खात होते. इकडे मात्र सर्व लोक त्यांना शोधत होते.



आणि एक दिवस पुन्हा ऋणमोचनची यात्रा आली. त्यांच्या समाजातील लोकांना डेबूजी दिसले. त्यांनी त्यांच्या घरी, त्यांच्या कुटुंबीयांना सांगितले. पत्नी, आई, मुले सर्व लोक ऋणमोचनला आले. पाहतात तर काय, डेबूजी यात्रेचा परिसर हातात खराटा घेऊन सकाळपासून झाडत आहेत. ऋणमोचनच्या नदीमध्ये उतरणारे लोक सगळीकडे चिखल झाल्यामुळे घसरून पडायचे. डेबूजीला वाटले की, तिथे घाट बांधले पाहिजे. म्हणून दरवर्षी ते कुदळ घेऊन पायऱ्या बनवायचे. पण पुढील पावसाळ्यात पुन्हा पूर्णा माय त्या पायऱ्या वाहून घेऊन जायची. पुढे याच ठिकाणी तिडके सावकाराच्या मदतीने त्यांनी पक्के घाट बांधले. डेबूजी फार शिकलेले नव्हते तरीही त्यांच्या उत्तरांपुढे लोक हतबल होऊन जायचे. त्यांच्या मुलीच्या जन्माच्या वेळेला त्यावेळच्या समाजाच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी बकरा कापला नाही. लोकांना दारू पाजली नाही तर उलट गोडधोडाचे जेवण दिले. त्यांच्या समाजाचे लोक नाराज झाले होते. डेबूजी म्हणायचे मला मुलगी झाली. आनंद झाला. अशा आनंदाच्या प्रसंगी बकऱ्याचा बळी देणं मला पटत नाही. लोक म्हणायचे, बरं दारू का पाजत नाही? म्हणायचे, दारू पिणं वाईटच आहे ना. लोक त्यांच्या प्रश्नांवर निरुत्तर व्हायचे. ऋणमोचनची यात्रा महिनाभर चालत होती. डेबूजी महिनाभर तो परिसर झाडत राहिले. काही चांगल्या लोकांनी त्यांना विचारले की, आम्ही तुमच्यासोबत मदत केली तर चालेल का? डेबूजी म्हणाले, हे समाजाचं काम आहे. सगळ्यांनीच केलं पाहिजे आणि मग त्यांच्यासोबत आणखी लोक यात्रेतला परिसर झाडू लागले. हळूहळू संख्या वाढू लागली. आता डेबूजी यात्रेचा परिसर झाडणे, बैलबंडी कुठे लावायची, स्वयंपाक कुठे करायचा, जेवणाच्या पंक्ती कशा मांडायच्या हे सांगू लागले...

डेबूजींचा वेश म्हणजे घरातून निघताना घातलेलं धोतर. पुढे तेही धोतर फाटले म्हणून त्याची त्यांनी लुंगी केली. डोक्याला कपडा बांधलेला. ठिकठिकाणी चिंध्या बांधलेल्या, हातामध्ये गाडगे आणि म्हणूनच लोक त्यांना म्हणू लागले 'गाडगे महाराज!'

प्रत्येक यात्रेच्या ठिकाणी ते जायचे. स्वच्छता करायचे. ज्याने ऐकलं त्याला सांगायचे. नाही ऐकलं तर सोडून द्यायचे. एखाद्या गावी जावे. हनुमंताचं मंदिर दिसले तर तो परिसर झाडावा. कोणी विचारले की का बरं झाडता? तर त्यांना सांगावे की संध्याकाळी कीर्तन आहे. संध्याकाळी लोक जमल्यावर त्यांना विचारायचे की, कीर्तनकार कुठे आहे? तर ते म्हणायचे ते नाही येणार. त्यांनी मलाच पाठविले आहे. त्यावर लोक हसायचे व आपल्या घरी जाऊ लागायचे. त्याच वेळेला त्यांच्या कानावर गोपाला...गोपाला...देवकीनंदन गोपाला... असा सुरेल आवाज पडायचा. लोक जमू लागले व त्यांना गाडगे महाराज ही मान्यता मिळू लागली.

मोठमोठ्या तीर्थक्षेत्रांमध्ये लाखोच्या संख्येने लोक जातात. परंतु त्यांच्या निवासाची व्यवस्था नाही. नदीवर स्नान करण्याची व्यवस्था नाही. हे सर्व बघून त्यांनी पंढरपूरला चोखामेळा धर्मशाळा, परीट समाज धर्मशाळा, मराठा समाज धर्मशाळा बांधल्या. नाशिक, देहू, आळंदी येथेही धर्मशाळा बांधल्या. मूर्तिजापूरला गोरक्षण सुरू केले. ऋणमोचनला त्यांनी लक्ष्मीनारायणाचं मंदिर बांधले. कधी कधी त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा त्यांना येऊन भेटायचे. बाबा त्यांना म्हणायचे, तुम्हीसुद्धा इतर लोकांसारखे काम करा. बाबांची प्रसिद्धी झाल्यावर अनेक ठिकाणांवरून त्यांच्याकडे पैशाचा ओघ सुरू झाला; पण बाबा कोणाच्याही पैशाला हात लावत नव्हते. समाजामध्ये असलेले अज्ञान, अडाणीपणावर त्यांनी जनजागृती केली. देव देवळात आहे आणि तो गरीब, निराधार, लुळे-पांगळ्यांमध्ये आहे. त्यांची पण सेवा केली पाहिजे, हा संदेश त्यांनी दिला. व्यसनाधीनतेवर त्यांनी खूप जनजागृती केली. व्यसनांमुळे कुटुंबाची राखरांगोळी होते, हे ते लोकांना पटवून द्यायचे. गावातल्या मंदिरात काळोख आहे. सर्वच विचार करतात की, कोणीतरी दिवा लावला पाहिजे. पण बाबा म्हणायचे, हा दिवा मी का लावू नये? समाजासाठी आयुष्यभर काम करणाऱ्या गाडगे महाराजांची आज जयंती आहे. त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## पानगळ : सृजनाचे वळण

निसर्गा, तुझ्यातल्या आगळ्या, सुंदर भावपणाचे सदैवच कौतुक वाटतं. तू या आधी तर चोख तुझा कार्यभार फार व्यवस्थित पाळत आलास आणि आताही काही अंशी पाळत येतोस. शिशिर ऋतूची चाहूल लागली की, किंचित वातावरणातली बदललेली कूस हवेतल्या बोचऱ्या स्पर्श भावनेतून जाणीवपूर्वक लक्षात येणारी असते. पहाटे आणि रात्रीची थंड छाया आणि दुपारी सूर्य कथा विस्तार तापवून स्वतःची छाप सोडत असताना वातावरणीय तप्त भाव सहजच खुणावत जातो, त्या तप्त होणाऱ्या मातीवर. मग हळूहळू कालांतराने, झाडांच्या फांद्यांवर असलेला पिकला भार कमी करून वाऱ्याच्या सोबतीने कोपरा शोधून कुठेतरी निपचित पहुडलेलं समाधान वाचायला मिळत. त्या पानांच्या भावनेत फार मोठं समाधान असलेलं भासतं जणू. कुठेतरी जरासे हळवे होऊन मनाला त्याची कथित भावना जाणण्याची आस लागत येते आणि मग, कधीकाळी कोवळी पालवी फुटून तिच्यात गर्द रंगाचे डोहाळे सामावले असतील, तिच्यात आनंद कथेचा सुंदर आशय सावली पुरवत लिहिलेला असेल. कधी कोणत्या



कळीवरचा भार उचलला असेल, कधी त्या फुलांचा गंध वेचला असेल, फुलून आलेल्या त्या फुलांची कथा मातीत मिसळून जाण्याच्या भावकलेतला निरोप पाहिलेला असेल, कधी वादळाने हेलावून गेलेल्या तुझ्या फांद्यावरची अनंत पाने तुझ्या सहवासातली भेदारून जाऊन शांत झालेल्या वादळावर समाधान आणि सुख शोधत असेल, असं बरंच काही चांगलं आणि वाईट अनुभूतीतून तुझी कथा आठवून आज कोपऱ्यात तुझी समाधानी पाऊलं त्या वाऱ्यासह हलकी होऊन तुझ्याच कथेतले तुझे निरूपण गात असेल, या आशेच्या विचार कथेतून तुझ्यात झिरपलेलं सुख आज त्या फांद्यांच्या तसेच मातीत रुजलेल्या घट्ट मुळाशी पुन्हा नवे आशय, पुन्हा नवी आशा अंकुरित होण्याकरिता हा पानगळीचा निसर्ग नियम फार काही शिकवून जातो. काही क्षण जरासे हळवे करून जातात, कधी? तर वाऱ्यासह उडून गेलेल्या अनुभवी पानांची ऋतुचक्रानुसार जेव्हा पानगळ लिहिली जाते तेव्हा त्या फांद्या फार भकास वाटत असतात. उदास करीत असतात. पुन्हा नव्याने नवी रुजवात होऊन नवी सुरुवात असेल, अशाच आशावादातली ही पानगळ, समाधानातून सृजनाकडे कललेला हा प्रवास सेतू...

**श्रद्धा राऊत बुरले**/नागपूर

## वाचक पत्रे

### रोजगार निर्मितीवर भर द्या

देशातील वाढती बेरोजगारी ही केवळ आकड्यांपुरती मर्यादित समस्या राहिलेली नाही; ती आज प्रत्येक कुटुंबाच्या चिंतेचा विषय बनली आहे. उच्च शिक्षण घेतलेले तरुण नोकरीच्या शोधात भटकताना दिसतात, तर ग्रामीण भागातील युवक शेतीवरील अवलंबित्व कमी झाल्याने पर्यायी रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. ही स्थिती बदलण्यासाठी रोजगार निर्मितीवर ठोस आणि दीर्घकालीन भर देणे अत्यावश्यक आहे. भारतासारख्या तरुण देशात कामगार शक्ती ही सर्वात मोठी संपत्ती आहे. मात्र, योग्य संधींचा अभाव असल्याने ही शक्ती निष्क्रिय राहत आहे. परिणामी आर्थिक विकासाचा वेग मंदावतो आणि सामाजिक असंतोष वाढतो. बेरोजगारीमुळे निर्माण होणारे नैराश्य, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि मानसिक ताण ही समाजासाठी धोकादायक लक्षणे ठरत आहेत. रोजगार निर्मितीसाठी शासनाने लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, स्टार्टअप उपक्रमांना आर्थिक सहाय्य देणे आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढविणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारल्यास स्थलांतर रोखता येईल. कौशल्य विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण दिल्यास तरुणांना तत्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रामीण भागातील रोजगार वाढविण्यासाठी रोजगार हमी योजना सारख्या योजनांची पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक आहे. या योजनांमुळे केवळ रोजगारच नाही तर गावांच्या पायाभूत सुविधांचाही विकास होऊ शकतो. याशिवाय खाजगी क्षेत्रानेही सामाजिक जबाबदारी स्वीकारून स्थानिक युवकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. शैक्षणिक संस्थांनी अभ्यासक्रम अधिक व्यावहारिक व उद्योगाभिमुख करणे ही काळाची गरज आहे. बेरोजगारीवर मात करणे म्हणजे देशाच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणे होय. रोजगार म्हणजे केवळ उत्पन्नाचा स्रोत नसून तो आत्मसन्मान आणि स्थैर्याचा आधार आहे. त्यामुळे शासन, उद्योग आणि समाज यांनी एकत्रितपणे रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य दिल्यासच भारताची तरुण शक्ती विकासाच्या प्रवाहात प्रभावीपणे सहभागी होईल.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे साहेब समवेत,लेखापाल उद्धव फपाळ,संख्याकी आधिकारी मोतीराम चव्हाण,कोषपाल मीनानाथ मुळे, निरीक्षक सुनील सवणे,वरिष्ठ लिपिक अमोल आगे, प्रतवारीकार अतुल होके,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**माजलगाव |** येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्र. प्राचार्य डॉ. एन. के. मुळे यांच्या हस्ते प्रथम गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. एन. के.मुळे म्हणाले की, संत गाडगे महाराज हे कृतिशील सुधारक होते त्यांनी आपल्या कृतीतून परिसर स्वच्छ केला तर कीर्तनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करण्याचे काम केले. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते कृतिशील समाजसुधारक व संत होते. यावेळी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती

## गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**केज |** तालुक्यातील साबला येथे कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी उपस्थित चेरमन उत्तम काकडे,लक्ष्मण महाराज काकडे,माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे,दत्तकुमार काकडे,नरहरी काकडे,आत्माराम काकडे,गुलाब मुळे,संतोष नाईकनवरे,सुरेश शिंदे,राजेभाऊ काकडे,महादेव काकडे,आदर्श शिक्षक सोनाजी काकडे,भागवत काकडे,शिवाजी काकडे,ज्ञानेश्वर काकडे,रामदास मुळे,पिंटु नाईकनवरे,विकास नाईकनवरे,बंडु नाईकनवरे,अंकुश काकडे,महादेव नाईकनवरे,पांडुरंग काकडे,रंगनाथ नाईकनवरे साबला नगरितील ईत्यादी नागरिकांच्या उस्थितीत कर्मयोगी,राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

## महिला महाविद्यालयाची वनस्पती उद्यानास अभ्यास भेट



**परळी , वार्ताहर |** येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असते . त्यांचा विकास व्हावा म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास सहलीचे आयोजन या महाविद्यालयातील विविध विभाग करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या मार्गर्शनात वनस्पतिशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनीची दि २३ फेब्रु २०२६ रोजी परळी येथील वनस्पत्युद्यानास (बॉटनिकल गार्डन) अभ्यासभेट सहल आयोजित करण्यात आली. या अभ्यास सहलीत वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संगिता कचरे यांच्यासह डॉ. वर्षा मुंडे प्रा. अशिलता शिंदे यांच्यासह बीएस्सीच्या अनेक विद्यार्थीनींची उपस्थिती होत्या. या अभ्यास भेटीत तिथे असलेल्या अनेक औषधीय वनस्पतींची यथार्थ माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. तसेच अनेक सौंदर्यवर्धक वनस्पतींचीही माहिती देण्यात आली. दैनंदिन जीवनामध्ये आपल्या सभोवताली असणाऱ्या वनस्पतींचा मानवी जीवनात कसा उपयोग होतो, याचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थिनींना करण्यात करण्यात आले. वनस्पतिशास्त्र विभागाच्या या उपक्रमाचे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भरभरून कौतुक केले.

## लक्ष्मण वाकडे यांचा ‘धडपड’ हा लेखसंग्रह पत्रकारिता क्षेत्रातील नव्या पिढीसाठी मार्गदर्शक-प्रशांत जोशी



**परळी वैजनाथ |** ‘धडपड’ हा लेखसंग्रह पत्रकारिता क्षेत्रातील नव्या पिढीसाठी उपयुक्त तर आहेच. शिवाय तो मार्गदर्शकही आहे. असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांनी केले.

परळीतील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक लक्ष्मण वाकडे यांच्या ‘धडपड’ या लेखसंग्रहाचे प्रकाशन येथील नेहरू चौक परिसरातील हनुमान कॉम्प्लेक्स येथे श्री जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना जोशी म्हणाले की गेली चार दशके परळीच्या पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले लक्ष्मण वाकडे यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून विविध विषयावर लेखन केले आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न वृत्तपत्रात मांडून त्यांना न्याय दिला आहे. वेगळ्या बातम्या व विषय त्यांनी मांडले आहेत. आपल्या कामातून त्यांनी नवीन पत्रकारांसमोर आदर्श उभा केला आहे. या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार संजय खाकरे, जगदीश शिंदे, न्यू हायस्कूलचे पर्यवेक्षक दाजीबा नखाते, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे, सुर्यकांत कातकडे, अमोल कांबळे, राहुल ताटे, सचिन काळम, पत्रकार दत्ता शिवगण, मोहन साखरे, माऊली होळंबे, रामदास कराड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# पंचशील आणि २२ प्रतिज्ञांचे आचरण हाच खरा धम्मप्रचार

## माजलगाव येथे जिल्हास्तरीय धम्मप्रचारक गौरव सोहळा उत्साहात पार

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव |** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सद्धम्माचा विचार घराघरात पोहोचवणाऱ्या धम्मयोद्ध्यांचा सन्मान करण्यासाठी माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. "बुद्धांचा मार्ग हा मानवी कल्याणाचा मार्ग आहे, त्यामुळे केवळ नावापुरते बौद्ध न राहता जातीचे बंधन तोडून पंचशील आणि २२ प्रतिज्ञांचे आचरण करणे हीच काळाची गरज आहे," असा सूर या सोहळ्यात उमटला.

कार्यक्रमाची सुरुवात आणि मानवंदना

जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व सातकर्णी युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावस्ती बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी समता सैनिक दलाच्या वतीने उपस्थित मान्यवरांना शिस्तबद्ध मानवंदना देण्यात आली, ज्यामुळे वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते.

कृती आणि करणीत फरक नको : प्रदीप भोगले

कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, "आपल्या कृती आणि करणीमध्ये अंतर असू नये. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा केवळ वाचण्यासाठी नसून त्या जगण्यासाठी आहेत. अष्टांगिक मार्गाचा अवलंब करूनच आपण समाजाला नवी दिशा देऊ शकतो."

मराठीतून धम्म समजावून सांगा : प्रा. श्रीकिशन मोरे

मुख्य वक्ते प्रा. श्रीकिशन मोरे यांनी आपल्या अमोघ



वाणीने उपस्थितांना अंतर्मुख केले. ते म्हणाले, "बाबासाहेबांनी आपल्याला सर्व काही दिले, पण आपण समाजाला काय दिले याचा विचार करण्याची वेळ आली आहे. पाली ही आपली सांस्कृतिक भाषा असली तरी ती बोलीभाषा नाही, त्यामुळे बौद्धाचार्यांनी धम्माचा अर्थ मराठीतून समजावून सांगावा जेणेकरून तो सर्वसामान्यांना समजेल." त्यांनी पुढे पोटजातींचा त्याग करून केवळ 'बौद्ध' म्हणून एकत्र येण्याचे आणि इतर जातींतून धम्मात आलेल्या बांधवांना प्रेमाने सामावून घेण्याचे आवाहन केले.

संवैधानिक अधिकारांसाठी जागृत राहा : भास्करराव भोजने

अध्यक्षीय समारोप करताना विद्वत सभेचे अध्यक्ष भास्करराव भोजने म्हणाले की, "बाबासाहेबांनी जातीचा अंत करण्यासाठी धम्मचक्र प्रवर्तन केले. आपण त्यावर ठाम राहिले पाहिजे. आपले संवैधानिक अधिकार अबाधित राखणारा नेता निवडण्याची प्रगल्भता समाजात निर्माण व्हायला हवी." भैय्यासाहेब आंबेडकर आणि त्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी बौद्धांना केंद्रीय कोट्यातून देखील सवलतीचे लाभ मिळावे यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत आता पुन्हा मोठा लढा उभारण्याची गरज असल्याचे आवाहन देखील भोजने यांनी केलं.

महत्त्वाचे ठराव संमत:

या सोहळ्यात धम्म चळवळीच्या बळकटीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले: अभिजात पाली भाषा सर्व महाविद्यालयांत शिकवण्यात यावी. प्रत्येक तालुक्यात पाली भाषा शिकवणी केंद्र सुरू करावे. बौद्ध संस्कारांची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी. विधी वेळेवर पार पाडले जावेत. सर्वात महत्त्वाचे: महापुरुषांची जयंती 'डीजे' मुक्त करून वैचारिक पद्धतीने साजरी करावी.

धम्मयोद्ध्यांचा गौरव

यावेळी बीड जिल्ह्यातील ११ ही तालुक्यांतील सक्रिय धम्मप्रचारक, बौद्धाचार्य आणि समता सैनिक दलाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारत तांगडे, ॲड. रविकांत उघडे, बाबासाहेब जाधव, अशोक कांबळे, सुभाष बोराडे, लक्ष्मण जाधव, विशाल उघडे, विकास डोंगरदिवे, सुमेध जाधव, बिभीषण उघडे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास जिल्ह्यातील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनीषा तोकले यांना भारतरत्न सी. सुब्रमण्यम पुरस्कार प्रदान

तभा. वृत्तसेवा

**बीड |** जागर प्रतिष्ठान, ऊसतोड कामगार महीला संघटनेच्या माध्यमातून मनिषा तोकले यांनी गेली तिस वर्ष सामाजिक क्षेत्रात कार्य केलेले आहे. समाजातील दलित आदिवासी, महीला, उसतोड कामगार, आत्महत्या ग्रस्त शेतकरी परिवारातील महीलांच्या हक्कासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन, हा पुरस्कार





मनिषा तोकले यांना प्रदान करण्यात आला. मनिषा तोकले यांनी दि.२९ सप्टेंबर १९९३ साली किल्लारी जि. लातूर येथे झालेल्या विनाशकारी भुकंपामध्ये भुकंपग्रस्त लोकांसोबत पुनर्वसनासाठी कार्य केले आहे, ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भपिशवीचा प्रश्न मनिषा तोकले यांनी जागतिक पातळीवर हाताळला. ऊसतोडणी बंद व्हावी म्हणून महीलांना कमी खर्चात शेती कशी करावी हे शिकवले, बीड तालुक्यातील काठोडा व घोडका राजूरी येथील महीला कमी खर्चाची शेती करून त्यांनी उसतोडणी थांबलेली आहे. महिला किसान अधिकार मंच सोबत राहुन मनिषा तोकले यांनी आत्महत्या ग्रस्त शेतकरी परिवारातील महीलांसोबत कार्य केलेले आहे.

## घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; स्थानिक गुन्हे शाखेने आरोपींना ठोकल्या बेड्या

तभा. वृत्तसेवा

**बीड |** पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून चोरीच्या रकमेपैकी दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही ताब्यात घेतली आहे. विशेष म्हणजे तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पाठलाग करून या टोळीला पकडले आहे.



काही दिवसांपूर्वी पाटोदा परिसरात घरफोडीची एक मोठी घटना घडली होती. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पाटोदा पोलीस या प्रकरणाचा समांतर तपास करत होते. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, काही तरुण या चोरीच्या घटनेत सामील असून ते एका दुचाकीवरून जामखेडच्या दिशेने निघाले आहेत.

थरारक पाठलाग आणि आरोपींना अटक

मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी तातडीने पथके तैनात केली. आरोपी दुचाकीवरून साकत मार्गे जामखेडला गेल्याचे समजताच पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. महासांगवी शिवारात पोलिसांनी अत्यंत शिताफीने या टोळीला घेरले आणि त्यांना ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी ज्योतीराम शरद भोसले, राहुल काशिनाथ पवार आणि बनेश बाबुशा भोसले या तिघांची कसून चौकशी केली असता, त्यांनी पाटोदा येथील घरफोडीची कबुली दिली.

पकडण्यात आलेल्या आरोपींकडून पोलिसांनी दोन लाख रुपयांची रोकड हस्तगत केली आहे. तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. या आरोपींना पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी पाटोदा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या टोळीकडून परिसरात झालेले आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. या कारवाईमुळे घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस दल अधिक सतर्क झाले आहे.

## सनराईज स्कूलची शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचाल गौरवास्पद : नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी

### उत्तुंग भरारी घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांच्या पंखांना बळ द्यावे- अभिनेत्री प्रेरणा खरात

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ |** परिवर्तन युवा मंच संचलित, सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, परळी-वैजनाथ यांचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या दिमाखदार सोहळ्याने परळीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.







कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना परळी नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी म्हणाल्या की, सनराईज स्कूलची शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचाल अत्यंत गौरवास्पद आहे. परळी शहराच्या नावलौकिकात भर घालणारे उत्तम विद्यार्थी या संस्थेतून घडतील असा मला विश्वास आहे.असे सांगून शाळेचे कौतुक केले.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरलेल्या मिस इंडिया स्माईल अवॉर्ड विनर, मॉडेल व अभिनेत्री प्रेरणा खरात यांनी आपल्या भाषणात उत्तुंग भरारी घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांच्या पंखांना बळ देऊन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहावे असे आवाहन करत सनराईजचे स्नेहसंमेलन म्हणजे केवळ कार्यक्रम नसून तो उत्साह, कला आणि संस्कृतीचा एक सुंदर संगम आहे, असे प्रतिपादन केले.

मंचावर नगरअध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी ,कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे,

अभिनेत्री व मॉडेल प्रेरणा खरात, सिने-नाट्य अभिनेता, लेखक व दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे ,पंचायत समितीचे सभापती बालाजी (पिंटू) मुंडे,भगवान सेनेचे प्रदेश अध्यक्ष माणिकभाऊ फड, नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे,परळी शहर पोलीस स्टेशनचे एपीआय नितीन गट्टूवार,तलाठी श्यामसुंदर गित्ते,संस्थेचे अध्यक्ष गोविंदरावजी मुंडे ,सचिव सौ. प्रियतमा मुंडे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र चाटे,उद्धव कराड ,फुलचंद मुंडे,प्राचार्य प्रदीप खताळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती

## जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा विराट मोर्चा धडकला



**बीड |** भारतीय किसान संघ जिल्हा शाखा बीडच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा धडकला आहे.

या निवेदनावर भारतीय किसान संघाचे प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके, जिल्हा मंत्री आप्पाराव यादव, जिल्हाध्यक्ष तुकाराम चोपडे, जिल्हा सहमंत्री अशोक तौर, बाळासाहेब भोजणे, प्रकाश कुलकर्णी यांच्या स्वाक्षऱ्या असून, आजच्या मोर्चात बीड जिल्ह्यातील असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले होते.

या संदर्भात जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, पीएम व सीएम किसान निधी मध्ये दुप्पट वाढ करावी,2019 नंतरच्या शेती खातेदारास सन्माननिधी सुरू करावा,2019 पूर्वीच्या काही शेतकऱ्यांचा सन्माननिधी बंद पडला असून तो पूर्ववत सुरू करावा, यावर्षीच्या खरीप हंगामात अतिवृष्टी झाल्यामुळे शासनाने प्रति हेक्टर 17500 रुपये विमा जाहीर केला परंतु प्रत्यक्षात विमा दिला नाही, पांदण रस्ते, गावजोड रस्ते,इ.जि.मा. मार्ग प्रमुख जिल्हा मार्गाचे मजबुतीकरण करावे जेणेकरून ग्रामीण शेतकऱ्यांना त्रास होणार नाही,

# किल्ले धारूर येथे डॉ. स्वरूपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली 'मन की बात' व 'टिफिन पे चर्चा' संपन्न!

## पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री फडणवीस यांच्या लोककल्याणकारी योजनांचा जागर; महिलांचा अभूतपूर्व सहभाग

तभा. वृत्तसेवा

**धारूर |** दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी किल्ले धारूर येथील 'सुजाण लॉन्स' आणि 'कॅप्टन राजपालसिंह हजारी स्कूल' या दोन्ही ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली 'मन की बात' आणि 'टिफिन पे चर्चा' हा अनोखा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी डॉ. हजारी यांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा पाढा वाचत कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

शासकीय योजनांचा थेट संवाद

कार्यक्रमादरम्यान डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबवल्या जाणाऱ्या विविध जनहितकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. विशेषतः 'मोफत अन्नधान्य योजना', 'घरकुल योजना' आणि महिलांसाठी अत्यंत प्रभावी ठरलेली 'लाडकी बहीण योजना' यावर त्यांनी प्रकाश टाकला. या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहोचवावा, यावर टिफिन चर्चेत सविस्तर रणनीती आखण्यात आली.

महिला शक्तीचा जागर

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांचा



असलेला प्रचंड सहभाग. 'टिफिन पे चर्चा' करत असताना महिलांनी आपल्या समस्या मांडल्या आणि डॉ. हजारी यांनी त्या सोडवण्याचे आश्वासन दिले. घरोघरी जाऊन शासनाच्या योजना पोहोचवण्याचा निर्धार यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांची मांदियाळी पाहायला मिळाली. कार्यक्रमास मंडल अध्यक्ष संदीप काजगुंडे, जिल्हा सचिव ॲड. बाळासाहेब चोले, शहराध्यक्ष दत्ताभाऊ धोतरे, युवा नेते रामप्रभू मुंडे, नगरसेवक रोहितसिंह हजारी (सोशल मीडिया संयोजक), रोहनसिंह हजारी, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष ॲड. मोहन भोसले, गट नेत्या सारिकाताई सिरसट, तालुकाध्यक्ष गणेश बडे, नगरसेविका माधुरीताई लोकरे, भारतीकाकी तिवारी, ज्योतीताई सिरसट यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच नगरसेवक बालाजी चव्हाण, विनायक शिनगारे, प्रदीप नेहरकर, युवा नेते दादासाहेब घोळवे, बाळराजे लगड, नदीम मोमिन, धनंजय नागरगोजे, बाळू नागरगोजे, फारुख भाई यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हळद व्यापाऱ्याची फसवणूक करणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

## १७ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त, स्थागुशाची कार्यवाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दि २९ जानेवारी रोजी व्यापारी संतोष भक्कड व साक्षीदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून बिहार येथे ट्रकमध्ये पाठविलेली हळद ट्रक चालकाने अपेक्षित ठिकाणी न नेल्यामुळे फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे दिला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने व्यापाऱ्यांची फसवणूक करणारी आंतरराज्य टोळी जेरबंद केली आहे.

या आरोपींकडून १७ लाख ५० हजारांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

हिंगोली येथील हळद व्यापारी संतोष भक्कड आणि त्यांचे साथीदार यांनी त्यांच्याकडील हळद एका ट्रकमध्ये बिहार राज्यातील गया येथे विक्रीसाठी पाठविली होती. परंतु सदरील हळद ट्रक चालकाने अपेक्षित ठिकाणी न नेल्यामुळे व्यापारी भक्कड यांनी ट्रक चालकाला संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु मोबाईल बंद असल्यामुळे तसेच हळद अपेक्षित ठिकाणी वेळेत न गेल्यामुळे त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी दि २९ जानेवारी रोजी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे दिला. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अनेक बाबींचा सखोल तपास करून गोपीनय बातमीदार व तांत्रिक बाबींचा अभ्यास केला. या माहीतीच्या आधारे सदरचा गुन्हा जफरूल हसन बशिर अहेमद कुरेशी रा खंडूपाडा, पात्रेवाली चाळ कल्याण रोड भिवंडी, शेख जावेदअली शेख लायखअली व्य चालक, रा रईसपेठ बोधन निझामाबाद, शेख अतीक शेख मोहम्मद व्य चालक सक्कूर नगर बोधव जि निझामाबाद व इतर एक साथीदार यांनी संगनमत करून केला आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्यावरून पोलिस पथकाने तीनही आरोपींना ताब्यात घेवून विचारपूस केली असता सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यांचेकडून गुन्ह्यातील मुद्देमाल विकून कमावलेले पैसे असे एकूण १७ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघड केला आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि माधव जिव्हारे, दिलीप मोरे, अंमलदार कोंडबा मगरे, सुभाष घुगे, शेख शकील, लिंबाजी वाव्हळे, संदीप जाधव, किशोर सावंत, विशाल खंडागळे, आजम प्यारेवाले, शंकर हराळ, सतीश जाधव, पांडुरंग राठोड, विक्की कुंदनानी यांच्यासह दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे, इरफान पठाण, मारोती काकडे, प्रणीता मोरे यांनी केली आहे.

# हिंगोली जिल्ह्यात पाणीटंचाईच्या सीईओंकडे ५०० तक्रारी

## मार्च अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्याच्या बैठकीत सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
हिंगोली जिल्ह्यात मागील दोन महिन्यात पाणी टंचाईच्या तब्बल ५०० तक्रारी प्राप्त झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी तीव्र संताप व्यक्त केला. शनिवारी सुट्टीच्या दिवशीही पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी व कंत्राटदारांची बैठक घेवून पाणी योजना ३१ मार्चपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना गायकवाड यांनी दिल्या आहेत.

हिंगोली जिल्ह्यात ग्रामीण भागातून तीव्र पाणी प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील पाणी प्रश्नावर उपाय योजना करा या मागणीचे निवेदन प्राप्त होऊ झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी शनिवारी नक्षत्र सभागृहात बैठक घेतली. यावेळी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता राजू नरवाडे, अभियंता बारी खान, संदेश जाधव यांच्यासह कंत्राटदार उपस्थित होते.

जिल्ह्यातील ६३३गावात जलजीवन मिशन अंतर्गत नळ योजनेची कामे सुरू असून ३४९ गावात नळ योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. अद्याप दोन गावात नळ योजनेला सुरूवात करण्यात आली नाही. दरम्यान २१४ गावात पाणीपूरवठा सुरू आहे. तर १८३ गावात ७६ ते ९९ टक्के कामे पूर्ण झाले मात्र अद्याप पाणी सुरू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली असून अधिकारी गावात गेल्यानंतर गावकरी पिण्यासाठी पाणी देण्याऐवजी शिव्या देत असल्याचे सांगितले. दोन महिन्यात ५०० लोकांनी पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे कंत्राटदारांनी नळ पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करावीत. दि ३१ मार्च पर्यंत कामे पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचा इशारा गायकवाड यांनी दिला आहे. याशिवाय कंत्राटदारांनी कामे पूर्ण केली नाहीत त्यांना इतर कामे करता येणार नाहीत असेही स्पष्ट केले. जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामांच्या दर्जाबाबतही अनेक तक्रारी गावकऱ्यांनी केल्या आहेत. परंतु या तक्रारीची दखल पाणीपूरवठा विभागाचे अधिकारी घेत नसल्यामुळे तसेच गावकऱ्यांचा समस्या ऐकून घेत नसल्यामुळे येत्या उन्हाळ्यात पाणीप्रश्न भेडसावण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# माझी वसुंधरा अभियानात हिंगोली नगर परिषद राज्यात दुसऱ्या क्रमांकावर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
माझी वसुंधरा अभियान ४.०अंतर्गत ५० हजार ते १ लाक्ष लोकसंख्या असलेल्या गटात सर्वोत्तम कामगिरी करीत राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे तर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यानिमित्त मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम वरळी येथे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव जयश्री भोज यांच्याहस्ते हिंगोली नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, गटनेते श्रीराम बांगर, अभियंता प्रतीक नाईक, व्यवस्थापक पंडीत मस्के यांना मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राज्यात दुसऱ्या क्रमांकाचे चार कोटी रूपये तर विभागात प्रथम आल्यामुळे ७५ लाख रूपये असे एकूण चार कोटी ७५ लाख रूपयांचे बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

# बोगस आधारकार्ड, फोटो लावून जमिनीचे खरेदी खत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील शेतकऱ्याच्या दोन गटातील एकूण चार एकर जमिनीची बनावट दस्ताऐवज तयार करून परस्पर विक्री करणाऱ्या चौघांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार मसोड येथील एका सातव नावाच्या शेतकऱ्याची मसोड शिवारातील गट क्रमांक ५३ मध्ये दोन एकर जमीन आहे. तसेच गट क्रमांक ७८ मध्ये दोन एकर जमीन आहे. सदर चार एकर जमीन ते वहिती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. या जमीन विक्रीबाबत त्यांनी कुठल्याही प्रकारचा करारनामा केला नाही तसेच जमिनीची विक्रीही केली नाही. दरम्यान, सदर गावातील कही व्यक्तींनी बनावट कागदपत्रे तयार केली. त्यानंतर हिंगोली येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात या जमिनीचे खरेदीखत नोंदविले. या खरेदीखत नोंदवित असतांनी त्यांनी जमिनीच्या मालकाचे छायाचित्र व आधारकार्ड देखील तयार करून लावले. या कागदपत्रांच्या आधारावर दि ३१ जानेवारी रोजी या चार एकर जमिनीचे खरेदीखत नोंदविण्यात आले होते.

सदर प्रकार मुळ मालक असलेल्या सातव यांना समजल्यानंतर त्यांनी तातडीने सह दुय्यम निबंधक कार्यालय गाठून खरेदी खताच्या प्रती काढल्या. यामध्ये त्यांची जमीन परस्पर विक्री करण्यात आल्याचे दिसून आले. यावर त्यांनी सहदुय्यम निबंधक संजय सुंकवाड यांना माहीती दिली. यावरून सुंकवाड यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी कान्होपात्रा भालेराव रा मसोड, शाम सोळंके रा कळमनुरी यांच्यासह अन्य एकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात पोलिस निरीक्षक संदीप मोदे, उपनिरीक्षक वाघमारे, जमादार अशोक धामणे, संजय मार्के, शंकर ठोंबरे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, गणेश वाबळे यांचे पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आले आहे.

कळमनुरी येथील जमिनीचे खरेदीखत हिंगोली सहदुय्यम निबंधक कार्यालयात कसे काय झाले असा सवाल निर्माण झाला असून शेतकऱ्याची जमीन बनावट कागदपत्राच्या आधारे विक्री कशी झाली. याबाबतही चर्चा होत असून आरोपींना अटक केल्यानंतर उलगडा होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### लिपीकांचा कर्मचाऱ्यांचा आंदोलनाला पाठींबा



हिंगोली-जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेने २३ फेब्रुवारीपासुन पुकारलेल्या आंदोलनास पाठींबा देत असल्याचे निवेदन औंढा नागनाथ पंचायत समितीतील लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेने गटविकासअधिकारी गोपाळ कल्हारे यांना निवेदन दिले आहे. निवेदनात महाराष्ट्रातील लिपीक संवर्ग निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर चौथ्या आयोगापासून अन्याय झाला आहे. वेतन त्रुटी, पदोन्नतीस्तर कमी करणे तसेच इतर मागण्यासाठी संघटनेनेतर्फे २३/०२/२०२६ पासुन बेमुदत कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे.सदरील आंदोलनास पंचायत समिती औंढा नागनाथ कार्यालयातील लिपिक वर्गीय कर्मचारी पाठींबा देत आहेत. यावेळी एस.डी गुट्टे, अक्षय बगाटे, नितीन हजारे, आर एम पवार, मनोहर तुमराम, उदय देशपांडे, अंबादास कुहिरे, ए पी वाघमारे, पी वाय शेख आदी उपस्थित होते.

### वन्यजीव बचाव व संरक्षण प्रशिक्षण संपन्न

हिंगोली- येथील वन विभागाच्यावतीने विभागीय वनाधिकारी राजेंद्र नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१/०२/२०२६ व २२/०२/२०२६ क्षेत्रीय कर्मचारी यांच्यासाठी वन्यजीव बचाव व संरक्षण प्रशिक्षण दोन दिवसांचे आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. स्वप्निल सोनवणे व पंकज बंडाबुचे, वनरक्षक राजू जाधव, वनरक्षक हरिसिंग घुशिंगे, पंढरीनाथ पाटील अहिरे हे तिघही शीघ्रकृतिदल छत्रपती संभाजी नगर यांनी सदर विषया बाबत प्रशिक्षणार्थी यांना ०२ दिवसांचे प्रशिक्षण दिले. याप्रसंगी सहाय्यक वनसंरक्षक सचिन माने, गंगाधर ढगे, वनपरिक्षेत्र अधिकारी कु.मिनाक्षी पवार, टाक, केंद्रे, पाटील, जाधवर, नागरगोजे यांची उपस्थिती होती. या ०२ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये वनपाल व वनरक्षक यांनी वन्यजीव बचाव व संरक्षण तसेच एअर गनने बंदुकीचे या बाबतचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. याप्रसंगी विभागीय वन अधिकारी कार्यालयातील कर्मचारी वन्यजीव कक्ष रामदास बेद्रे, लेखापाल व सचिन शेळके लिपिक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

### आदर्शमध्ये संत गाडगे बाबा जयंती साजरी

हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वच्छतेची शिकवण देऊन किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे थोर संत गाडगेबाबा यांची जयंती दिनांक २३ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुष्पहार व पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय अधिकारी, कर्मचारी संघटनेचा जिल्हाकचेरीवर आक्रोश मोर्चा, धरणे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
जय महाराष्ट्र शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्यावतीने विविध मागण्यांसाठी दि २३ फेब्रुवारी रोजी आक्रोश मोर्चा काढीत धरणे आंदोलन केले आहे.

यावेळी जिल्हा परिषद अंतर्गत शासकीय व निमशासकीय लिपीक संवर्गीय कर्मचारी या आक्रोश मोर्चात सहभागी झाले होते. चौथ्या वेतन आयोगापासून राहीलेल्या त्रुटी दूर करणे, पदोन्नती व पदनाम देणे तसेच जुनी पेन्शन योजना लागू करणे आदी प्रमुख मागण्यांसाठी लिपीक संवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. तसेच धरणे आंदोलन सुरू केले आहे. सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून या कालावधीत सर्व कार्यालयीन व इतर कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे. त्यामुळे वेतन देयके सादर करण्यात येणार नाहीत. अधिवेशनातील कोणतीही माहीती दिली जाणार नाही. त्यामुळे कार्यालयीन कामे प्रलंबीत राहण्याची दाट शक्यता आहे. तत्काळ मागण्या मंजूर कराव्यात अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजीव घुगे, संतोष बांगर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये शिवजयंती विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर तरोडा (बु) नांदेड येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक सुनील राठोड व मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संपूर्ण परिसर भगवामय झाला होता आणि जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण दुमदुमले. शाळेच्या मैदानापासून साई मंदिरापर्यंत प्रभात फेरी काढण्यात आली. या फेरीत ढोल-ताशा, लेझीम आणि शिवगर्जना यामुळे परिसर उत्साहाने भरून गेला. साई मंदिरासमोर शिवगर्जना घेण्यात आली आणि तेथील वातावरण शिवमय झाले. विद्यार्थ्यांचा सहभाग, घोषणाबाजी आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर परिसरात उत्साहाचे वातावरण निमर्ण झाले. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रशासक मारुती मेखाले व शैक्षणिक सल्लागार केदार शर्मा आणि शिक्षक शिक्षकत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडू जोगदंड यांनी केले.

# ग्रामपंचायत प्रभाग रचनेसंदर्भात औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
औंढा येथील पंचायत समिती सभागृहात औंढा नागनाथ तालुक्यातील ८८ ग्रामपंचायत प्रभाग रचने संदर्भात सोमवार (ता.२३) फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार हरीश गाडे व गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांनी बैठक घेतली.

औंढा नागनाथ तालुक्यातील ८८ ग्राम पंचायतीची मुदत संपलेली आहे. या ८८ ग्रामपंचायत प्रभाग रचना मंडळ अधिकारी ,ग्राम महसूल अधिकारी ,ग्रामपंचायत अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार दिलेल्या निर्देशाची काटेकोरपणे पालन करून संबंधित ग्रामपंचायतची प्रभाग रचना विहित मुद्दतीत पार पाडावी.काळजीपूर्वक प्रभाग फोडण्यात यावेत. यासह विविध मुद्द्यावर तहसीलदार हरीश गाडे यांनी बैठकीस सखोल असे मार्गदर्शन केले.

माहे जानेवारी २०२६ ते माहे डिसेंबर २०२६ या कालावधीमध्ये मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायत तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम विहीत वेळेत पार पाडावयाचा आहे. यावेळी गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे,महसूल नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, विस्तार अधिकारी सय्यद जमीर, सचिन शिरसागर, उमाकांत मुळे, विनोद घोडके, विनोद साळवे यांच्यासह निवडणूक विभागातील कर्मचारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी आदी उपस्थित होते.

# सोडेगाव येथे आज शिवजन्मोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**
अखिल हिंदुस्थानचे आराध्य दैवत व स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोडेगाव येथे मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समस्त गावकरी मंडळी, सोडेगाव यांच्या वतीने हा शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

सकाळी ८.०० वाजता पूजन व वृक्षारोपण सोहळ्याने कार्यक्रमाची सुरुवात होणार असून, सकाळी ९.०० वाजता भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सायंकाळी ४ ते ९ या वेळेत पालखी सोहळा व भव्य मिरवणूक पार पडणार असून, रात्री ९.०० ते ११.०० या वेळेत शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी सुप्रसिद्ध शिवव्याख्याते डॉ. केशव खवटींग हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या सर्व कार्यक्रमांना सोडेगाव व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजयंती उत्सव यशस्वी करावा, असे आवाहनआयोजकांकडून करण्यात आले आहे.

## संक्षिप्त...

### टिपराळ येथील तरुण शेतकऱ्यांनी केला शेतकरी संघटना मध्ये जाहीर प्रवेश



**शिरूर अनंतपाळ :** टिपराळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथील तरुण शेतकऱ्यांनी शेतकरी संघटना मध्ये जाहीर प्रवेश करत संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा दिली. महूरगड येथे आयोजित एकदिवसीय कृषी तंत्रज्ञान मार्गदर्शन शिबिरात टिपराळ येथील तरुण शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शिबिरानंतर खालील तरुण शेतकऱ्यांनी स्वर्गीय शरद जोशी साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शेतकरी संघटनेचा बिल्ला लावून जाहीर प्रवेश केला. श्री मधुकर ममदापुरे, श्री अनिल ममदापुरे, श्री गंगाधर बिराजदार, श्री सत्यवान पाटील, (सर्व रा. टिपराळ) यांचा समावेश असून हा प्रवेश सोहळा अनिल घनवट यांच्या हस्ते पार पडला. यावेळी माजी आमदार वामनराव चटप, ललित बाहाळे पाटील, गुणवंतराव पाटील हंगरगेकर, अरुण गुणवंतराव बिरादार, अर्जुन कावळे तसेच असंख्य शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी नव्याने प्रवेश केलेल्या तरुण शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांना वाचा फोडण्यासाठी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत तत्पर राहू, असा निर्धार व्यक्त केला. या प्रवेशामुळे परिसरातील शेतकरी चळवळीला नवी ताकद मिळणार असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.

### शेंद (प.) येथे शिवजयंती निमित्त सर्वरोग निदान शिबिरास प्रतिसाद



**शिरूर अनंतपाळ :** २२ फेब्रुवारी २०२६ रोजी शेंद (प.) – छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शेंद पश्रि्चम येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवछत्रपती प्रतिष्ठान पश्रि्चम शेंद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र साकोळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. या शिबिराला स्थानिक ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ८० नागरिकांची तपासणी करण्यात आली असून त्यांच्या रक्ताचे नमुने पुढील तपासणीसाठी लातूर येथे पाठविण्यात आले. महिलांसाठी विशेष तपासणीची सोय करण्यात आली होती. ही जबाबदारी डॉ. पूनम येलूरकर (वैद्यकीय अधिकारी, साकोळ) यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या प्रसंगी नारायण देशमुख (ता. आरोग्य अधिकारी), डॉ. संग्राम सोमवंशी (वैद्यकीय अधिकारी, शिरूर अनंतपाळ), श्री. विठ्ठल सूर्यवंशी (आरोग्य विस्तार अधिकारी) तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र साकोळ येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शेंद पश्रि्चम येथील जबाबदार नागरिक लिंबराज माने, बापू भिंगे तसेच शिवछत्रपती प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.शिवजयंतीनिमित्त आयोजित या आरोग्य उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली आहे.

### मंगेशकर महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी



**निलंगा:** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.नागनाथ तेलंगे यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी राधा तोरसले (बी.ए.प्रथम वर्ष) यांनी आपल्या मनोगतातून संत गाडगेबाबा यांच्या विचार व कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.विनोद जाधव यांनी केले. याप्रसंगी डॉ.अशोक नारनवरे, डॉ.रितेश व्यास, विलासराव होटकर, राजेंद्र बेलुरे, विजयकुमार बाबछडे, रूपेश मोरे, मारोती पवार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या अंतिम फेरीसाठी समृध्दी पाटोळेची निवड!

**लातूर** : जेएसपीएम लातूरद्वारा संचालित स्वामी विवेकानंद विद्यालयातील समृध्दी पाटोळे या विद्यार्थीनीने डॉ.होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनिय यश संपादन केले आहे. या परीक्षेतील लेखी परीक्षा व प्रात्याक्षिक परीक्षेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करीत पुढील फेरीसाठी प्रवेश मिळविला असून प्रकल्प सादरीकरण व मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम फेरीसाठी निवड होणार आहे.विज्ञान विषयातील अतिश नामांकित व स्पर्धात्मक असलेल्या या परीक्षेत राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून फक्त सात टक्के विद्यार्थ्यांची प्रात्याक्षिक परीक्षेसाठी निवड केली जाते व त्यामधून केवळ एक टक्के विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड होते. अशा अवघड परीक्षेमध्ये स्वामी विवेकानंद विद्यालयातील समृध्दी पाटोळे या विद्यार्थीनीने यश मिळवलेले आहे.

# निलंगा येथे शिवजयंती निमित्त लाडू वाटप

## निलंगा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त लाडू वाटप

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २२ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निलंगा शहरात विविध ठिकाणी उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या पार्श्र्वभूमीवर डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवा कुंड यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत लाडू वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जयंतीनिमित्त सकाळपासूनच शहरातील विविध भागांत शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येत होता. याच अनुषंगाने सामाजिक सेवा कुंडच्या



कार्यकर्त्यांनी एकत्र येत नागरिकांना व बालकांना लाडू वाटप केले. यावेळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवा कुंड हे गेल्या काही वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, जयंती, पुण्यतिथी तसेच इतर सामाजिक प्रसंगी समाजहिताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. गरजू नागरिकांना मदत, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप अशा अनेक उपक्रमांमुळे संस्थेने निलंगा परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या लाडू वाटप कार्यक्रमावेळी सेवा कुंडाचे रामलिंग पटसाळगे, दिगंबर सूर्यवंशी, गोविंद सूर्यवंशी, प्रकाश गायकवाड, दत्तात्रेय सूर्यवंशी, दत्ता शिंदे, अविनाश सूर्यवंशी, शुभम सूर्यवंशी, सुधीर पटसाळगे आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करून समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याचा संकल्प केला. निलंगा शहरात या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## लाल बहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २३ फेब्रुवारी :** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात स्वच्छतेचे उपासक व विज्ञानवादी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे,प्रमुख मार्गदर्शक माधव केंद्रे व प्रमुख पाहुणे म्हणून विभाग प्रमुख सुधाकर पोलावार उपस्थित होते.मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक माधव केंद्रे यांनी संत गाडगेबाबा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले.त्यांनी स्वच्छता,शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी मोठे कार्य केले.सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा आदर्श घ्या.अंधश्रध्दा दूर करा . शिक्षणाचे महत्त्व समजून घ्या.समता व बंधूभाव जोपासा.गरजूंची मदत करा.आपण स्वच्छ, सुजाण आणि सेवाभावी नागरिक बनण्याचा संकल्प करा. असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपपर भाषणात मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी संत गाडगेबाबांनी आयुष्यभर स्वच्छता,समाजसेवा, शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन गावोगावी स्वच्छता केली आणि समाजाला कृतीतून संदेश दिला.कर्म हीच पूजा हा त्यांचा आदर्श आपण सर्वांनी आचरणात आणला पाहिजे.

आजच्या दिवशी आपण सर्वांनी एक संकल्प करू आपली शाळा व परिसर स्वच्छ ठेवूया, अंधश्रद्धेला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारूया, शिक्षणाद्वारे स्वतःची आणि समाजाची प्रगती साधूया, सर्वांशी प्रेम, समता आणि बंधुभावाने वागूया.असे आवाहन केले. सुत्रसंचलन श्रीमती सुनेजा मठपती यांनी केले.

## निलंगा येथे २४ फेब्रुवारीला पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

### नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २३ फेब्रुवारी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित आस्थापना आणि उद्योजक सहभागी होणारं असून, त्यामुळे जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.




मेळाव्यात दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा तसेच इतर कोणत्याही शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार सहभागी होऊ शकतात. विविध क्षेत्रांतील पदांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. मुलाखतीसाठी शैक्षणिक प्रमाणपत्रे, स्वतःचा रिझ्युमे, बायोडाटा, पासपोर्ट आकाराचे फोटो (किमान पाच प्रती) इत्यादी सोबत आणावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २३ फेब्रुवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार यांनी गाडगेबाबाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार, कार्यालय प्रमुख दयानंद स्वामी, दिनविशेष समितीचे प्रमुख प्रा. डॉ. एम. एस .खांडेकर तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## धुमाळे परिवाराला संगिता पाटील निलंगेकर यांची सांत्वनपर भेट

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २३ फेब्रुवारी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे लोकप्रिय नेते अशोकभैय्या शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या सुविद्य पत्नी ॲड. सौ. संगिताताई अशोकराव पाटील निलंगेकर यांनी शिरूर अनंतपाळ येथील काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते व पंचक्रोशीतील प्रसिद्ध बि-बियाणे व खते व्यापारी स्व. व्यंकटराव वैजनाथराव धुमाळे यांच्या निधनाबद्दल धुमाळे परिवाराची सांत्वनपर भेट घेतली.

स्व. धुमाळे यांचे काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शिरूर अनंतपाळ परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



यावेळी संगिताताई पाटील निलंगेकर यांनी धुमाळे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी ईश्र्वरचरणी प्रार्थना व्यक्त केली. स्व. धुमाळे यांनी सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात केलेल्या कार्याची आठवण उपस्थितांनी यावेळी काढली.

या प्रसंगी स्थानिक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अशी माहिती अशोकराव पाटील निलंगेकर यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते सुधीर लखनगावे यांच्याकडून माहिती प्राप्त झाली.

## ग्रामीण रूग्णालयास बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर , दि. २३ फेब्रुवारी :** येथील ग्रामीण रुग्नालयास बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार प्रदाण करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा वंदनीय बाळासाहेब ठाकरे अरोग्यरत्न पुरस्कार आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते ग्रामिण रुग्नालय अधिक्षक डॉ.अनिता अलगुले (रेड्डी )यांना प्रदान करण्यात आला या प्रसंगी आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह आरोग्य विभागाचे सचिव,आयुक्त,संचालक, यांची उपस्थिती होती.

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा ध्यास घेऊन डॉ.अनिता अलगुले याच्या मार्गदर्शनात ग्रामीण रुग्णालय रेणापूर या संस्थेने बी.ओ.आर, ओ.पी.डी, आय.पी.डी,मेजर सर्जरी, मायनर सर्जरी,नॉर्मल डिलेव्हरी, सेजेरीयन सेक्शन च्या निवड निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल हा पुरस्कार ग्रामिण रुग्नालयास प्रदान करण्यात आला .विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या शंभर दिवशीय कार्यालयीन कामकाज सुधारणा कार्यक्रमामध्ये त्यांना संभाजीनगर विभागातून प्रथम क्रमांक मिळाला होता. ग्रामिण रुग्नालय अधिक्षकडॉ.अनिता अलगुले( रेड्डी) यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अंबुलगा बु. येथे मोफत आरोग्य शिबिरात २०८ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २३ फेब्रुवारी :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथे लातूर येथील स्पर्श हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्श हॉस्पिटलचे मुख्य संचालक डॉ. नारायण नागमोडे यांचे वडील कै. दादाराव नागमोडे यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या शिबिरात २०८ रुग्णांची मोफत तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आले आहेत.

या शिबिराचे उद्घाटन नवनिर्वाचित जि. प. सदस्य चंद्रकांत विठ्ठल होरे आणि माजी पंचायत समिती सदस्य सुभाष म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील प्रतिष्ठित



नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची सखोल तपासणी केली. यामध्ये प्रामुख्याने:लहान बालकांचे आजार व दातांची तपासणी हृदयविकार तपासणी ईसीजी व इतर शुगर आणि बीपी (रक्तदाब) तपासणी शिबिरात सहभागी झालेल्या रुग्णांना मोफत औषधी वाटप करण्यात आले. तसेच, विशेष सवलत म्हणून रक्त व लघवी तपासणीवर ५० टक्के सूट आणि महागड्या औषधांवर २० टक्के सूट देण्यात आली होती.

या मोफत घेण्यात आलेल्या शिबिरामध्ये स्पर्श हॉस्पिटलचे मुख्य संचालक डॉ. नारायण नागमोडे यांच्यासह डॉ. अमोल सूर्यवंशी, डॉ. प्रदीप लेंगरे, डॉ. पंकज धनगे, डॉ. कृष्णा सराटे आणि डॉ. सचिन तुपडीकर यांनी रुग्णांची विशेष तपासणी करून त्यांना पुढील उपचारांसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील लोकांसाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल अंबुलगा बु. आणि परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी गावातील शांतेश्र्वर पाटील सुग्रीव सूर्यवंशी बाबू शिंदे वामनराव देशमुख यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.


**जाहीर प्रगटन** — दै. तरूण भारत

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **मंगला संजय सुर्यवंशी, रा.**तुगाव, ता.जि.बीदर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना १ ) **सचिन बंडू भिसे** रा.न्यू भाग्य नगर लातूर **आणि** २ ) **रब्बानी नजीरोद्दीन शेख,** रा.मुरुड बु. ता.जि.लातूर यांनी प्लॉटचे मुळ मालक दत्ता बालासाहब सोळुंके यांचे कडून ठरावपत्र करून घेतलेल्या पैकीचा प्लॉट जो की, मौ.पाखरसांगवी ता.जि.लातूर येथील जमीन गट नं ५३ पैकीचा असून याचा एन.ए झालेला एन.नं नं २००३/जेएमबी/सीआर -८९९,दिनांक.१६/०४/२००३ अन्वये सप्नाडिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट याचा लेआऊट नं.एलटीआर /एनए / जी.नं.५३ /पाखरसांगवी /एनआरएलन -१००४,दि.०७/०४/२००३ अन्वये मे.नगर रचनाकार,लातूर यांनी मंजूर केलेला प्लॉट क्रं.३ चा दक्षिण भाग असून याची लांबी पूर्व-पश्चिम ४० फुट आणि रुंदी दक्षिण-उत्तर २५ फुट असून एकूण क्षेत्र ९२.९३ चौ.मी (१००० चौ.फुट) असून याचा ग्रामपंचायत मिळकत क्रं.१००८३ असून याची चतु : सीमा खालील प्रमाणे :-

पुर्वेस - प्लॉट क्रं. ३०, पश्चिमेस - १५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं २, उत्तरेस - सदर प्लॉटचा उर्वरीत भाग करीमसाब सय्यद व गुलाब उजेडे यांचा.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर प्लॉट बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखत,बक्षीसपत्र,कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात** ( ०७ ) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरचा प्लॉट हा निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर प्लॉटचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक :- २३/०२/२०२६

तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**मंगला संजय सुर्यवंशी,**
रा.तुगाव, ता.जि.बीदर
मो नं.९३२१६ ८४९७८

### अवैध रेती उपसा विरोधात ग्रामीण पोलीसांची कारवाई

# एकाचवेळी पाच ठिकाणी छापा, अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ फेब्रूवारी-**

काल दुपारपासून ते रात्री उशिरापर्यंत नांदेड ग्रामीण पोलिसांनी वांगी, इंजेगाव, नागापूर, सिध्दनाथ, पुणेगाव हद्दीतील गोदावरी पात्रात एकाचवेळी छापे टाकून एकूण २ कोटी ६३ लक्ष २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी काल दुपारी ते रात्री उशिरापर्यंत गोदावरी नदीपात्रातील वांगी, इंजेगाव, नागापूर, सिध्दनाथ, पुणेगाव हद्दीत धाडी टाकून अवैधरित्या रेती उपसा करुन त्याची साठवणूक करणाऱ्या व्यक्तीविरुध्द कारवाई केली. यात पाच मोठ्या लोखंडी बोटी, पाच मध्यम लोखंडी बोटी, फायबर बोटी, वाळू उपसा करणारे इंजिन, ८५ ब्रास रेती, ५० तराफे असा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी यातील नमुद बोटी, तराफे, फायबर बोटी त्याच ठिकाणी जाळून नष्ट केल्या. आरोपी करण सोनटक्के, शहाजी सोनटक्के, छगन बुक्तरे सर्व रा.ब्राम्हणवाडा, गजानन मस्के रा.नागापूर व इतर सात जणांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ९,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३,७ सार्वजनिक नुकसान प्रतिबंधक अधिनियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. यातील काही आरोपी पळून गेले. त्यांचा शोध सुरु असल्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी दिली. याठिकाणी कुठलीही परवानगी नसताना मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा केला जात होता. त्यासाठी आधुनिक इंजिनचा वापर केला जात होता. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी या धाडसी कारवाईबद्दल ग्रामीण पोलीस ठाण्याच्या टिमचे अभिनंदन केले आहे.

# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही अंदाचा माळ अंधारात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ फेब्रूवारी-**

देश स्वातंत्र्याची ७८ वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करत असताना अंदाचा माळ येथील आदिवासी शेतकरी मात्र अजूनही अंधारातच आहेत. तालुक्यातील अंबाडी गावाच्या उत्तरेला, किनवट-मांडवी राज्य महामार्ग लगत असलेल्या या शिवारात आजपर्यंत वीज पोहोचलेली नाही. परिणामी, शासनाच्या योजना कागदावरच राहिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच फलोत्पादन



योजना राबविल्या जात आहेत. मात्र, मूलभूत सुविधा असलेल्या विजेचाच अभाव असल्याने या सर्व योजना निष्फळ ठरत आहेत.

येथील तीन शेतकऱ्यांना बिरसा मुंडा योजनेअंतर्गत सिंचन विहिरी मंजूर झाल्या आहेत. विहिरींमध्ये पाणी साठलेले आहे; परंतु विजेचा एकही खांब उभारलेला नसल्याने पाण्याचा उपसा करणे अशक्य ठरले आहे. पाणी डोळ्यांसमोर आहे, पण ते शेतात नेता येत नाही. आमचं स्वप्न फक्त कागदावरच राहिलं, अशी व्यथा किसन गेडाम यांनी व्यक्त केली.

रमेश गेडाम, विठ्ठल गेडाम, सुभाष गेडाम, भीमराव कुमरे, सतीश पेंदोर, परचाके आदी शेतकऱ्यांनी संतप्त प्रतिक्रिया देत प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शासन योजना देते, पण वीज वितरण कंपनी मूलभूत सुविधा देत नाही. मग आमच्यासारख्या आदिवासी शेतकऱ्यांनी कोणाकडे न्याय मागायचा? असा सवाल त्यांनी केला.

प्रशासनाची भूमिका काय?

या संदर्भात संबंधित वीज वितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, अंदाचा माळ परिसरात वीजपुरवठ्यासाठी प्रस्ताव प्रलंबित असून तांत्रिक मंजुरीनंतर लवकरच काम सुरू करण्यात येईल, असे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात काम कधी सुरू होणार याबाबत स्पष्ट वेळापत्रक देण्यात आले नाही.

दरम्यान, शेतकऱ्यांनी लवकरात लवकर वीजपुरवठा सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही मूलभूत सुविधेसाठी झगडावे लागत असल्याने अंदाचा माळातील शेतकऱ्यांचा संताप तीव्र झाला आहे.

# गटविकास अधिकारी बदलले, ग्रामसेवकांचा कारभार कधी बदलणार ? ; नागरिकांचा संतप्त सवाल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २३ फेब्रूवारी-**

हदगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत येथील कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांच्या कारभाराने आता कळस गाठला असून कामांना विनाकारण विलंब करणे, अनेक लोकाभिमुख योजनेतील लाभ मिळवून देण्याकरिता लाचेची मागणी करणे, मुख्यालय हजर न राहणे, कर्तव्यात कसूर करणे, ग्रामीण भागातील नागरिकांना विविध प्रकारचे प्रमाणपत्रांसाठी व कागदपत्रांसाठी हेलपाटे मारायला लावणे यासह अनेक प्रकारच्या त्रासांना सामोरे जावे लागत असून यास दुजोरा मिळाला काही दिवसांपूर्वी घडलेल्या पंचायत समिती हदगाव येथे राडाने आणखीन बळ मिळाला असून गटविकास अधिकारी बदलले आता ग्रामसेवकांचा कारभार कधी बदलणार ? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे विद्यमान आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी देखील ग्रामसेवकांच्या भ्रष्ट कारभार विरोधात आक्रमक भूमिका घेत चौकशीची मागणी केली होती.

पंचायत समिती हदगाव अंतर्गत एकूण १२५ ग्रामपंचायत असून यावर १०८ ग्रामसेवकांच्या मदतीने कारभार हाकला जात आहेत. यातील बहुतांशी ग्रामसेवकांकडे अतिरिक्त पदभार असून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे. नमुना नंबर.८, जन्म मृत्यू प्रमाणपत्र यासह विविध प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागरिकांना हदगाव शहरात हेलपाटे मारावे लागत आहेत या कामी त्यांचे वेळ तर वाया जातच आहे या सोबतच पैशाची उधळपट्टी होत आर्थिक फटका देखील बसत आहे. शासकीय योजनांच्या लाभ मिळवून देण्यासाठी लाचेची मागणी करणे, कामांना विनाकारण विलंब लावणे, काम सांगितले तर उडवा उडवी चे उत्तरे देणे, गावातील नागरिकांना विविध योजनेअंतर्गत माहिती मिळू न देणे आपल्या मर्जीनुसार सेवा बजावत असल्यामुळे गट विकास अधिकारी व ग्रामसेवकांत आर्थिक संबंध जोपासले जात आहेत की काय ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने नागरिकांमधून उपस्थित केले जात आहेत तरी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी यावर लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# रासेयो विशेष शिबिराचे उद्घाटन



**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २३ फेब्रूवारी-**

येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबिर ( शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास ) दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ या काळात मौजे गोणेगाव ता.मुखेड जि. नांदेड येथे संपन्न होत आहे. या शिबिराचे उद्घाटन दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोणेगाव येथे झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ गोजेगावचे अध्यक्ष माननीय श्री रामचंद्रावजी (बबन) पाटील गोजेगावकर हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य विवेक इनामदार, सरपंच सौ लक्ष्मीबाई भाऊराव डोरनाळे, उपसरपंच विमलबाई दिंडे,पोलीस पाटील विष्णुपंत गंदिगुडे, मुख्याध्यापक धरणे पांडूरंग, शिवराज पाटील गोजेगावकर,अनिल बालाजी पाटील,दिपक खेगटे हे उपस्थित होते. तसेच सहशिक्षक काशिनाथ राठोड, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर श्रीमंगले, शालेय समिती अध्यक्ष गोविंद दिंडे, अमृतराव दिंडे, संजय डोरनाळे, नवसाजी पाटील,बालाजी पाटील, आर्चनाताई डोरनाळे,मनिषा डोरनाळे,शिलाताई राजूरे, फुलाबाई डोरनाळे , राजेश्री कांबळे,हनमंत नागरवाड,राजूरे ज्ञानेश्वर,दिंडे विठ्ठल,सदानंद नागरवाड, कपिल पाटील,माधव बोईनवाड,नरसिंग राजूरे, माधव दिंडे,शादुल शेख, विठ्ठल ग्यानोबा देवकत्ते (ग्रा.संदस्य) चंद्रकांत देवकत्ते,विठ्ठल चांदोबा देवकत्ते, शेषेराव रामराव देवकत्ते,मष्णाजी डोरनाळे (सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी), सुधाकर नागरवाड,गोविंद दिंडे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ मा. म. गायकवाड यांनी केले तर प्रास्ताविक स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक इनामदार यांनी केले.

या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मा.रामचंद्र (बबन) व्यंकटराव पाटील यांनी केला. या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद येथील रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ मादळे रामदास यांनी मानले.



## मुदखेड मध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी

**मुदखेड** -स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आयुष्य वेचणारे थोर संत गाडगेबाबा (डेबूजी झिंगराजी जानोरकर) यांची जयंती दरवर्षी प्रमाणे याही दि.२३ फेब्रुवारी रोजी शहरातील नांदेड मार्गावर असलेल्या त्यांच्या फलकास पुष्प पुजा व पुष्पहार अर्पण करून त्यांना अविवादन करण्यात आले. संत गाडगे महाराज यांनी अस्वच्छता, अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष केला होता. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला आणि स्वच्छता व सेवा हे त्यांच्या कार्याचे सार होते. संत गाडगेबाबा यांनी शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी वसतिगृहे व धर्मशाळा स्थापन केल्या. म्हणूनच गाडगेबाबांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत, जे खऱ्या अर्थाने स्वच्छतेकडून समृद्धीकडे नेणारे आहेत. महाराष्ट्रातील अस्वच्छता दूर करून हातात झाडू घेऊन त्यांनी समाज प्रबोधन केले, तसेच कीर्तनातून साध्या राहणीचे व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. असे थोर राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची जयंती यशस्वी करण्यासाठी धोबी समाजाचे तालुकाध्यक्ष तथा पत्रकार संतोष सावंत व धोबी समाज बांधवांनी परिश्रम घेतला होता. यावेळी न.पा. नगराध्यक्ष प्रतिनिधी माधव पा. कदम, उपनगराध्यक्ष इम्रान सेठ मच्छीवाले,नगरसेवक रामसिंग चव्हाण, नगरसेवक संजय आऊलवार, नगसेवक प्रतिनिधी संदिप मोडवान, पप्पू सोनटक्के, प्रभाकर पांचाळ, संजय बोकेफोड, माजी नगसेवक कैलास गोडसे, नागोराव चिलवंतकर,सचिन चंद्रे, एकबाल कुरेशी,सुशिल मुंगल,पत्रकार संजय कोलते,हाफिज कुरेशी, दत्ता वडपत्रे,यासह आदिंनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

## बिलोली शहरात शिवजन्मोत्सव सोहळा उत्साह साजरा

**बिलोली**-हिंदवी स्वराज्याचे संस्थापक.. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त १९ फेब्रुवारी रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास शिवप्रेमीनी मोठ्या संख्येनी उत्सफुर्त पणे अभिवादन केले. व तसेच आयोजित रक्तदान शिबिरात तिस दानशूर रक्तदात्यांनी रक्तदान केले आसुन या वेळी मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दर वर्षी प्रमाणे यंदाही शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून जेष्ठ नागरी वैजनाथ मेघमाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी उपविभागिय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर नायब तहसिलदार बालाजी मिठ्ठेवाड ना.त.परळीकर सपोनि कमल शिंदे उपनगराध्यक्ष अनुप अंकोशकर गटनेता नागनाथ तुमोड अँडो.भरत पवार,राजु पाटील शिंपाळकर, इंद्रजित तुडमे,दिलीप पांढरे, आनंद पा. बिराजदार,पांडुरंग रामपुरे,व्यंकटराव पा.खतगावकर,सुनिल यंबडवार सपोनि. शिवराज लोखंडे प्रा. शंकर पवार,अभिजित तुडमे,विजय कुंचनवार,बाबाराव पा. रोकडे,संदिप कटारे, अजमत चाऊस, गंगाधर पपुलवार, लक्ष्मीकांत कलमुर्गे,राजु गादगे,सय्यद रियाज,गंगाधर पा.नरवाडे, श्रीनिवास शिंदे,आशोक दगडे,गणेश पा.हांडे,भाऊसाहेब बनबरे,सयाराम निदाने आशोक पा. हिवराळे,चक्रधर टेकाळे, हाणमंत कदम,मारोती मालुसरे, साईनाथ रुद्रुरकर व पत्रकार बांधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मोठ्या संख्येनी मान्यवर शिवप्रेमी जनता उत्साहाच्या वातावरणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व फरांदे होंडा शोरुम बिलोलीच्या वतिने आयोजित रक्तदान शिबीरात उपविभागीय पोलिस अधिकारी शाम पानेगावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे सपोनि शिवराज लोखंडे स.पो.नि. सुरज तिडके अँडो.भरत पवार नगरसेवक शिवाजी गायकवाड, साईनाथ खंडेराय यांच्यासह ३० दानशुरानी रक्तदान केले आसुन पोलिस अधिका-यांनी रकतदान करुन आपल्या खाकी वर्दिचा समाजापुढे एक आदर्श या वेळी दाखवुन दिल्या बदल सार्वजनिक शिवजनमोत्सव समिती बिलोली व फरांदे होंडा कंपनीच्या वतीने राजु पाटील शिंपाळकर व प्रल्हाद सुर्यवंशी यानी सर्वांचे पुष्पहार देऊन स्वागत केले. तर रक्तदाते पोलीस अधिका-यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मळ्यावर हात फिरे गोफणीला... ज्वारीचं पीक आलंया राखणीला

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २३ फेब्रूवारी-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरातील अटकळी,टाकळी,आळंदी,केरूर, मुतन्याळ,थडीसावळी,गळेगांव,खतगांव,केसराळी, थडी हिप्परगा,रामपूर थडी,शेकबाडी,शिंपाळा आदि शेत शिवारात ज्वारीचे पीक भरजरी हिरव्याकंच हुरड्याने डवरले आहे. शेताशेतात भरगच्च कणसांनी उभे पीक वाऱ्यामंदी डोलू लागले आहे.मागचा पेरा असलेल्या शिवारात ज्वारी पोटुरग्यात आहे. काही शेतकरी ज्वारी विक्रीसाठी किंवा घरी खाण्यासाठी पेरणी केलेली असल्याने,हे पीक सद्यस्थितीत मन भारावणारे असेच आले आहे.

सकाळ आणि संध्याकाळपर्यंत शेतकरी आपल्या शेतातील मचाण(मळ्यावर)थांबून तोंडात जत्रेतील पिपाणी किंवा हातात गोफण घेऊन ज्वारी पिकावर येणाऱ्या पाखरांना हुसकावून लावत आहेत.हुरडा भरगच्च लगडल्याने दूरवरून पाखरांचे थवेच्या थवे रानाशिवारात येत आहेत.धुवारी पडल्याने काही रानात कणसं फिक्कट काळसर झालेली दिसून येतात.



## राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ फेब्रूवारी-**

शहरातील असर्जन येथील तक्षशिला बुद्ध विहार परिसरात राष्ट्र संत गाडगे महाराज जयंती निमित्त परिसराची स्वच्छता करण्यात आली.

राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त परिसरातील नागरिकांनी परिसर स्वच्छ करून संत गाडगे बाबा महाराजांना अभिवादन केले. यावेळी आकाश चव्हाण, दिगंबर हाके, तुकाराम वाघमारे, देविदास पवार, खदीरोद्दीन सिद्धीकी, शेख आसिफ अली, अलकाबाई काशिदे, शेषीकलाबाई हाके, शेख अलीमाबी अलीसाब, सारजाबाई रहाटे, सुमनबाई रगडे, मिराबाई चव्हाण, रेखाबाई खिराडे, जिजाबाई पाटील, सागरबाई पाटील, संगीता श्रावणे, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# सुधाकर पत्रभूषण पत्रकारिता पुरस्काराने संतोष पांडागळे सन्मानित



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ फेब्रूवारी-**

येथील दीनदयाल उपाध्याय प्रतिष्ठानतर्फे मानाचा समजला जाणारा व ज्येष्ठ संपादक कै. सुधाकरराव डोईफोडे यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या सुधाकर पत्रभूषण पुरस्काराने जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे यांना दि. २१ रोजी एका भव्य कार्यक्रमात सन्नानित करण्यात आले.

धर्मभूषण दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून मागील अनेक वर्षांपासून नांदेड भूषण व सुधाकर पत्रभूषण पुरस्कार देऊन समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तिंना सन्मानित करण्यात येते. २०२४ च्या सुधाकर पत्रभूषण पुरस्काराने संतोष पांडागळे यांना रोख रक्कम पाच हजार, मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे यांच्या हस्ते सपत्निक सन्मानित करण्यात आले. यावेळी दिलीप ठाकूर, स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, भाजपाचे माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, मनपाचे माजी उपायुक्त रत्नाकर वाघमारे, गंगाप्रसाद तोष्णीवाल, अड. गजानन पिंपरखेडे, ज्येष्ठ पत्रकार चारुदत्त चौधरी, अभय कुळकजाईकर, पन्नालाल शर्मा, रामेश्वर काकडे ,शीतल खांडील आदींची यावेळी उपस्थिती होती.

## बुधवारी लोहा येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २३ फेब्रूवारी-**

जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व वीर माधवराव नळगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून वीर माधवराव नळगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहा येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रावर संपर्कसाधण्याचे आवहन करण्यात आले आहे.

## श्री कपिलमूनी मंदिर परिसरात वॉटर कुलरची व्यवस्था करावी! : युवासेना

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २३ फेब्रूवारी-**

सध्या उन्हाळ्याची चाहूल लागली असून, वातावरणात हळूहळू उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांची तहान देखील वाढत आहे. त्यामुळे माहूर शहरातील श्री कपिलमूनी मंदिर परिसरात थंड पाण्याची गरज भासू लागल्याने येथे दररोज देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची तहान भागवण्यासाठी मंदिर परिसरात थंड पाण्याची सोय करणे अत्यंत गरजेचे असल्याने याठिकाणी वॉटर फिल्टर फ्रिजरणची (वॉटर कुलरची) व्यवस्था करुन देण्याची मागणी निवेदनाद्वारे युवासेना शहरप्रमुख विजयसिंह हजारी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी श्री दत्तात्रेय



शिखर संस्थान, माहूर मंदिर प्रशासनाकडे दि.२३ फेब्रुवारी रोजी केली आहे.

लाखो भविकांचे अध्दास्थान असलेल्या शहरातील वार्ड क्रमांक एक मधील श्री कुपिलमुनी मंदीर परिसरात भगवान श्री शंकराच्या दर्शनासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. सध्या उन्हाळा सुरू झाला आहे.मात्र, वाढत्या उन्हात शुद्ध थंड पिण्याचे पाणी ही मोठी समस्या याठिकाणी असून त्यासाठी ' श्री दत्तात्रेय शिखर संस्थान माहूर कडून पुढाकार घेऊन श्री कपिलमुनि मंदीर परिसरात 'पाणी फिल्टर फ्रिजर अर्थात वॉटर कुलरची व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे युवासेनेच्यावतीने श्री दत्तात्रेय शिखर संस्थान प्रशासनास करण्यात आली आहे. याठिकाणी शुद्ध पाणी उपलब्ध झाल्यास उन्हाळ्याच्या दिवसांत भाविकांची काळजी घेण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनावर् युवासेना शहर प्रमुख, विजयसिंह हजारी यांचेसह प्रशांत घोगरे, शिवशंकर सोनुणे,मनिष सोनकुसरे, सूरज लहानकर,भावेश शेवाळे,आशुतोष कुमरे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचे आदर्श आचरणात आणल्यास यश निश्चित मिळेल : प्रा. मिलिंद वाघमारे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ फेब्रूवारी-**

देगलूर येथील सिंधू महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. मिलिंद वाघमारे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन जीवनात स्पष्ट ध्येय निश्चित करावे आणि त्या दिशेने जिद्दीने वाटचाल करावी, असे प्रा. वाघमारे यांनी आपल्या भाषणात केले.

देगलूर येथील सिंधू कॉलेज ऑफ आय.टी. ॲण्ड सायन्स महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गणेश जाधव होते. यावेळी दैनिक तरुण भारतचे पत्रकार प्रा. मिलिंद वाघमारे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव अशोक दाचावार, उपप्राचार्य प्रा. मिलिंद राजूरकर व प्रा. अनुराधा गंधारे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रमुख वक्ते प्रा. मिलिंद वाघमारे म्हणाले की, शिवरायांनी स्वराज्य स्थापनेसाठी केवळ तलवारीच्या बळावर नव्हे, तर बुद्धीमत्ता, संयम आणि दूरदृष्टीच्या जोरावर कार्य केले. सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव, स्त्री-सन्मान, जलव्यवस्थापन,आरमार स्थापना, वृक्षारोपण, स्वच्छता आणि लोककल्याण या मूल्यांची पायाभरणी त्यांनी केली. विद्यार्थ्यांनी शिवचरित्राचा अभ्यास केल्यास नेतृत्वगुण, आत्मविश्वास, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा अंगीकारता येतात. यशस्वी जीवनासाठी शिवरायांचे चरित्र हे प्रेरणादायी मार्गदर्शक ठरते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे उपप्राचार्य मिलिंद राजूरकर, प्राचार्य गणेश जाधव, प्रियंका पवार, सुर्यकांत थडके, ऋतुजा जाधव, प्रसाद देवणे, ऋचा बंधमवार, श्रृती बिरादार, श्रृतीका कटकमवार व ऐश्वर्या खांडेकर आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तर संकेत भूपतवार यांने कार्यक्रमाचे छायाचित्रीकरण केले.

प्रास्ताविकेतून प्रा. मारोती सोनकांबळे यांनी महाविद्यालय आणि कार्यक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन प्रा. भिमराव दिपके यांनी केले, तर आभारप्रदर्शन सपना बुन्नावार यांनी मानले. यावेळी सांस्कृतिक प्रमुख प्रा. अभिनंदन सिताफुले, प्रा. बाबूराव टेकाळे, प्रा. डॉ. सुनिल वाघमारे, प्रा. वैष्णवी मॅडम, प्रा . सोनकांबळे मॅडम, मनीषा कळसकर, गजानन महाजन यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवजयंतीचा हा सोहळा केवळ स्मरणपुरता मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या मनात स्वराज्य, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तृत्वाची ज्योत पेटवणारा ठरला.